पुणे, किशोर– वर्ष ५४, अंक ६ वा, जून २०२५, (मासिक)– किंमत रु. ७/– पृष्ठे– ५२
Pune, Kishor- Vol. 54, Issue- 6, June 2025 (Monthly)- Price Rs. 7/- Pages- 52

# किशोर

जून २०२५



# येतील पुन्हा ती पाखरे

विलास ठोसर

कोरी करकरीत असेल पाटी
पुन्हा येईल पुस्तक हाती
शुभ्र स्वच्छ पोशाखामध्ये
आनंदेल आता आमुची छाती...


मैदानावर खेळ रंगतील
गजबजून जाईल शाळा
गुळगुळीत फळ्यावरती
अंक करतील सर गोळा...

जुने नवे ते मित्र भेटतील
होतील आमुच्या गाठीभेटी
मैदानावर डबे सोडवीत
होईल खाऊत वाटावाटी

अक्षरे गिरवीत शब्द वेचूनी
वाचतील ते खडखड धडे
सारे उल्हासाने, आनंदाने
भरतील ज्ञानअमृताचे घडे...

लक्ष गाठतील अभ्यासाने
भेदूनी गगनचुंबी शिखरे
उंच भरारी ती घेण्यासाठी
शाळेत येतील पुन्हा ती 'पाखरे'...

संपर्क : ९८२२७८९७९६



**किशोर** जून २०२५, वर्ष ५४ वे, अंक ६ वा, ज्येष्ठ-आषाढ शके १९४७

▶ संपादक :
कृष्णकुमार पाटील, संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

▶ प्रकाशक :
सचिन मेहता
प्र. नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक
निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

▶ निर्मिती अधिकारी : हेमंत बाबर

▶ अक्षरजुळणी : किशोर विभाग

▶ कार्यकारी संपादक :
किरण केंद्रे

▶ वितरण व्यवस्थापक
जी. आर. पानसरे

▶ मुखपृष्ठ : दिलीप दारव्हेकर
संपर्क : ८६६८५५२१७९

▶ *चित्रांकन : घनश्याम देशमुख,
रेश्मा बर्वे, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते,
लोकेश कुलकर्णी, विनोद गायकवाड,
राहुल पोतदार, माईंडईट संवाद*

## अंतरंग

- येतील पुन्हा ती पाखरे ........ *विलास ठोसर* ........ ०२
- खरा श्रीमंत ! ........ *अनुपमा भेदी* ........ ०६
- साल सुगीचे येऊ दे........ *संजय वाघ*........ ०९
- झेब्र्याने खरेच रस्ता ओलांडला का !........ *पीयूष सक्सेरिया, अनु- प्रसाद कुलकर्णी*........ १०
- खोडदा आणि होरं........ *सुहास बारटक्के*........ १२
- 'जिम कॉर्बेट' बाबाची गोष्ट!........ *मनोज बोरगावकर* ........ १५
- चला चित्र रंगवूया...! ........ *रेश्मा बर्वे*........ १९
- किरकोळ विक्रीच्या (Retail) क्षेत्रात AI ........ *अच्युत गोडबोले*........ २०

**अभिजात मराठी विभाग**

- शब्द गुहेतील अलिबाबा ........ *प्रवीण दवणे*........ २२
- पाय मोडलेली अक्षरे ........ *डॉ. नीलिमा गुंडी*........ २४
- गंमत शब्दांची........ *प्रा. विश्वास वसेकर*........ २६
- प्रश्नमंजुषा ........ *उदय कदम*........ २७

- दोन मित्र हजारो वृक्ष ........ *मालविका देखणे* ........ २८
- देवबाप्पा सांग तुझा मेल आयडी काय?........ *ऐश्वर्य पाटेकर* ........ ३२
- पाऊले चालती पंढरीची वाट ........ *रामकृष्ण अघोर*........ ३४
- योग ........ *संजय गावंडे*........ ३७
- कुतूहल. ........ *वसुंधरा भोपळे*........ ३८

**बालविभाग**

- भावी आधारस्तंभ ........ ४०
- उमलती प्रतिभा........ ४२
- चित्रकथा : जादूगाराची सुटका........ *घनश्याम देशमुख*........ ४४
- पाखरशाळा ........ *संतोष आळंजकर*........ ४६

**ENGLISH SECTION**

- BABY DOLL........ *Roshankumar Pilewan*........४७
- The Brave Ant Army........ *Charuta Prabhudesai*........४८
- Funny Puzzle........ *Ghanshyam Deshmukh*........५०

▶ ऑनलाईन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनीऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील (डमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ताः कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,** सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४, **संपादकीय** : ०२०- २५७१६१०७, **वितरण व तक्रार** : ०२०-२५७१६२४४,
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

# आमचा 'किशोर' दादा

■ सुनील काजारे

आमचा 'किशोर' दादा
मला आवडतो खूप
दर महिन्याला येतो
घेऊन आकर्षक रूप

कोडी, कथा यातल्या
असतात फारच गोड
मनोरंजनाला त्याच्या
नाही कसलीच तोड

अंतरंगात याची
असते मेजवानी छान
तनमन हरवून जाते
वाचताना एकेक पान

ऊन असो वा पाऊस
ना यास तयाची फिकीर
ज्ञानदानासाठी हा
असतो नेहमी तत्पर

आज, उद्या नि परवाही
आवडीने वाचत राहू
सुंदर प्रवासाकरिता तुला
कोटी कोटी शुभेच्छा भाऊ

संपर्क : ९९७०४७१०२०

# हाक निसर्गाची

हितगुज

किशोर मित्रमैत्रिणींनो, तुमची यंदाची सुट्‌टी कशी गेली? काय सांगता उन्हाने हैराण झालात? मैदानावर जाऊन खेळ खेळता आले नाहीत? थोडाच वेळ खेळायला मिळाले? तुमच्यापैकी काहींना उष्माघाताचा त्रास झाला? तुमचं अगदी खरं आहे. यंदाचा उन्हाळा खूपच तीव्र होता. अगदी प्रचंड त्रासदायक. त्यामुळे तुम्हांला घरात बसूनच बैठे खेळ खेळावे लागले. रानमेवा जपून खावा लागला. कंटाळा आला असेल ना या उन्हाचा तुम्हांला? चिडचिड पण झाली असेल नाही? तुमचे आजी-आजोबा, आई-बाबा, ताई-दादा, शेजारचे काका-काकू, मामा -मामी या सर्वांनाच या वर्षीच्या उन्हाळ्याचा कंटाळा आला असेल, त्रास झाला असेल नाही का? पण या वर्षी उन्हाळा एवढा त्रासदायक का झाला, याचा तुम्ही विचार केला आहे का? वर्तमानपत्रामध्ये, टीव्हीवरच्या बातम्यांमध्ये उष्माघाताच्या, पाणी टंचाईच्या बातम्या तुम्ही वाचल्या असतील, पाहिल्या असतील. वातावरण बदल (क्लायमेट चेंज), जागतिक तापमान वाढ (ग्लोबल वॉर्मिंग) यांसारखे शब्द तुमच्या कानावर पडले असतील. कदाचित तुमच्यापैकी काहींनी वाढत्या उन्हाळ्यावर, त्याच्या दुष्परिणामांवर गप्पा मारल्या असतील. आजूबाजूच्या मोठ्यांच्या चर्चा ऐकल्या असतील. त्यातून काही गोष्टी तुम्हांला समजल्यादेखील असतील. आणि अजून काही गोष्टी तुम्हांला जाणून घ्याव्याशा वाटत असतील. हो ना?

किशोर मित्रमैत्रिणींनो, पर्यावरण, भवताल म्हणजेच आपला निसर्ग हा मानवी जीवनाचा महत्त्वाचा घटक आहे. अगदी अविभाज्य म्हणा ना! पण हाच अविभाज्य घटक सध्या संकटात आहे. तो थोडा आजारी पडला आहे आणि आपण त्याची काळजी घेतली नाही तर तो खूप, अगदी कायमस्वरूपी आजारी पडू शकतो. म्हणजे पहा, गेल्या काही वर्षांत पावसाळ्यात काही ठिकाणी प्रचंड पाऊस पडतो तर काही ठिकाणी प्रचंड दुष्काळ. हिवाळ्यात काही ठिकाणी तीव्र बर्फवृष्टी होते तर काही ठिकाणी पाऊस किंवा ऊन. उन्हाळ्यातही तापमान विक्रमी प्रमाणात उष्ण होते तर काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाऊस होतो. त्यामुळे ढगफुटी, अचानक आलेले पूर, दरडी कोसळणे या समस्या निर्माण होतात. असे हे आपल्या प्रिय निसर्गाच्या ऋतूंचे चक्र पूर्णपणे बिघडले आहे. अगदी उलटेपालटे झाले आहे, सरमिसळच झाली आहे म्हणा ना! गेल्या काही हजार वर्षांपासून असे बदल न पाहिलेल्या या भूमीसाठी, आपल्या पृथ्वीसाठी आणि त्याच्यावरील मानवासकट सर्व प्राणिमात्रांसाठी हा प्रकार नवा, आश्चर्यकारक आणि तितकाच त्रासदायक देखील आहे. यंदाच्या उन्हाळ्यात तर आपल्या सूर्याला जणू खूपच मोठ्ठा ताप आला. त्यामुळे बहुतांश ठिकाणी कमाल तापमान सरासरीपेक्षा जास्त झाले. उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र झाल्या आणि त्यांचा कालावधी देखील वाढला. परिणामी उन्हाचा चटका आणि उकाडा मोठ्या प्रमाणावर वाढला. देशातील पहिल्या दहा उष्ण शहरांत विदर्भातील चंद्रपूर, ब्रह्मपुरी, अमरावती आणि अकोला या शहरांचा समावेश झाला.

हवामान बदलामुळे पृथ्वीवरील सर्व मानवजातीचे व जीवसृष्टीचे अस्तित्वच आता धोक्यात आले आहे. आपल्या निसर्गावर एकानंतर एक येत जाणाऱ्या संकटांमुळे खूप ताण निर्माण होत असून तुमच्या-आमच्यासकट पुढच्या पिढ्यांचे भविष्य अक्षरशः टांगणीला लागले आहे आणि याला केवळ आणि केवळ आपणच म्हणजे जगभरातील मनुष्य प्राणीच जबाबदार आहे. जंगल, देवराया यांची मोठ्या प्रमाणातील तोड, वाळू उपसा, डोंगर, टेकड्या फोडणे, सिमेंट-काँक्रीटची जंगले तयार करणे, लोकसंख्या वाढ, जल प्रदूषण, वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, मानवाची आधुनिक जीवनशैली या आणि अशा अनेक मानवी हस्तक्षेपांमुळे मानवासकट सर्व विश्व सध्या संकटात सापडले आहे आणि यावर उपाय न शोधल्यास; आपल्यामध्ये शाश्वत, निसर्गपूरक अत्यावश्यक बदल तातडीने न केल्यास त्याची खूप मोठी किंमत या विश्वातील सर्वच घटकांना चुकवावी लागेल हे निश्चित. पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली म्हणत, 'मानवजात नाहीशी झाली तर वनस्पती, पक्षी व प्राणी यांचं काहीही बिघडणार नाही. मात्र ही जीवसृष्टी नष्ट झाली, तर मानवजात जगू शकणार नाही. खरं सांगायचं तर आपली पृथ्वी आपल्याशिवायही जगू शकते. मानव पृथ्वीवर नसला तरी येथील निसर्गातील सर्व काही व्यवस्थित चालू राहू शकते. आजघडीला बदलत्या हवामानाचा सर्वात जास्त आणि खरा धोका मानवी संस्कृतीला आहे. त्यामुळे आता आपल्याला पृथ्वीची नाही तर मानवतेची काळजी करण्याची अधिक गरज आहे.

**किरण केंद्रे**
**कार्यकारी संपादक**

अनुपमा भेदी

# खरा श्रीमंत

गायत्रीताई निवांत पेपर वाचत बसल्या होत्या. तेवढ्यात दाराची बेल वाजली ''आत्ता या वेळेला कोण असेल?'' असे मनात म्हणतच त्यांनी दार उघडले. तर दारात सुनंदाबाई उभ्या होत्या! चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसत होता. आत येताच त्यांनी गायत्रीताईंना पेढे दिले व वाकून नमस्कार केला.

''ताई, माझ्या सचिनला तुमच्यामुळे एवढ्या मोठ्या शाळेत ॲडमिशन मिळाली बघा. तुमचे खूप उपकार आहेत आमच्यावर.'' हे म्हणताना सुनंदाबाईचे डोळे पाणवलेच.

पेढ्याचा तुकडा तोंडात टाकत गायत्रीताई म्हणाल्या ''अगं तुझा लेक हुशार आहे, स्मार्ट आहे म्हणून मी जरा प्रयत्न केला. चांगला शिकेल व मोठा होईल. काळजी करू नकोस. पण, सुनंदाबाई तुम्ही फीचे कसे करणार? सध्या तुम्ही माझ्या सेंटरला पार्टटाईम काम करता, आता फुलटाईम करा. म्हणजे पगार डबल होईल.''

''नाही ताई, फुल टाईम तर मी करू शकत नाही. कारण सचिन शाळेतून घरी यायच्या वेळेला मी घरी हवी ना! नाहीतर त्याच्या जेवणाचे हाल होतील. आणि मी घरी नसली तर त्याला करमत नाही बघा.'' थोड्या कौतुकाने व लटक्या तक्रारीच्या आवाजात सुनंदाबाई म्हणाल्या, ''त्यापेक्षा, त्याच्या बाबांना ओव्हरटाईम करा म्हणते. म्हणजे फिचा प्रश्न सुटू शकेल.'' गायत्रीबाईंना पुनः नमस्कार करून सुनंदाबाई परतल्या.

सचिन आता सहावीत गेल्याने त्याची शाळा बदलावी लागली. आधीची शाळा पाचवीपर्यंत होती. 'ज्ञानज्योति विद्यालयात' ॲडमिशन मिळाल्याने त्याचे आईबाबा खूष होते. नवीन शाळेत पहिल्या दिवशी सचिन जरा गोंधळला. पण गोखले बाईंनी त्याला त्याची वर्गखोली दाखवली व म्हणाल्या, ''सचिन, अजून एक नवीन मुलगा या वर्गात येणार आहे.'' सचिनला उत्सुकता होती की अजून कोण असेल माझ्यासारखा नवीन येणारा मुलगा? तेवढ्यात एक आलिशान कार शाळेच्या फाटकासमोर थांबली. ड्रायव्हरने गाडीचे दार उघडले व त्यातून रोहित उतरला!



रोहितचे वडील येथे बदली होऊन आले होते. एका मोठ्या कंपनीचे ते चीफ ब्रँच मॅनेजर होते. रोहितचा आज शाळेतला पहिला दिवस असल्याने नवीन शाळेत त्यालाही हुरहुर वाटतच होती. गोखले बाई त्यालापण वर्गात घेऊन आल्या. त्याची व सचिनची ओळख करून दिली. दोघेही एकाच बेंचवर बसले. मधल्या सुट्टीमध्ये सगळीकडे एकत्र फिरले. संपूर्ण शाळा बघितली. आधीच्या शाळेच्या गमतीजमती एकमेकांना सांगत पहिला दिवस संपला. सचिनने घरी आल्यावर जेवताना आईला शाळेतला सर्व वृतांत सांगितला व म्हणाला, ''आई, आणखी एक नवा मुलगा आलाय – रोहित! एकदम ऐटीत राहतो बरं का! जाम श्रीमंत वाटतोय!''

हळूहळू सचिन व रोहितमध्ये चांगली मैत्री झाली. खरे तर रोहित फारसा बोलका नव्हता पण सचिनच्या बोलक्या स्वभावामुळे दोघांची जोडी चांगली जमली. सचिनला तर रोहित एखाद्या सिनेमातल्या हिरोसारखा वाटायचा. रोज ड्रायव्हर गाडीतून शाळेत सोडायला व घ्यायला यायचा. गाडीचे दार उघडायचा, बंद करायचा! रोहितच्या गणवेशाला एकदम कडक इस्त्री, बुटांना चकचकीत पॉलीश–त्याचा थाटच वेगळा! शिवाय त्याची स्कूल बॅग तर वेगळीच पण खूप मस्त होती. अन् पाण्याची बाटली तर जादूचीच असणार; कारण पाणी थंड–गरम दोन्ही होत होतं! लंचबॉक्स व कंपॉस–पेटी तर एकदम हटकेच होती! खोडरबर अन् शार्पनर तर तो रोज वेगवेगळ्या प्रकारचे आणायचा – एकाहून एक सरस! सचिन या सर्व गोष्टींमुळे भारावून गेला व आपण फारच गरीब आहोत याचे त्याला खूप वाईट वाटत होते. त्यामुळे काही झाले तरी श्रीमंत व्हायलाच हवे हे त्याने मनात पक्के ठरवले होते. एकदा रात्री जेवताना त्याने आपला श्रीमंत होण्याचा बेत आईबाबांना सांगितला.

''आधी खूप शिकून मग श्रीमंत होणार ना? मग आमची काहीच हरकत नाही,'' सुनंदाबाई नवऱ्याकडे बघत म्हणाल्या. एक दिवस शाळा सुटल्यावर रोहित व सचिन, रोहितच्या गाडीची वाट बघत होते. तेव्हा रोहितने ड्रायव्हरला फोन करण्यासाठी खिशातून मोबाईल काढला. मोबाईल बघून सचिन चक्रावलाच, म्हणाला, ''बाप रे! केवढा मस्त आहे रे ! ए, मला दाखव पाहू.'' ड्रायव्हरला फोन करून रोहितने सचिनच्या हातात फोन दिला. ''केवढा सॉलिड आहे यार! पण रोहित, शाळेत मोबाईल आणायचा नाही असा नियम आहे ना?''

''अरे हो, मला माहीत आहे पण माझी मम्मी घरी नसते. डॅडी तर खूप बिझी असतात व बहुतेक प्रवासातच असतात. त्यामुळे काही अडचण आली तर जवळ हवा म्हणून रोजच फोन आणतो. हेडसरांची परवानगी घेतली आहे. रोज त्यांच्याकडेच असतो. आज चुकून माझ्याकडे राहिला.''

मोबाईल बघून सचिन एकदम चकितच झाला होता. श्रीमंत होण्याचा त्याचा इरादा अजून पक्का झाला. तेवढ्यात गाडी आली व रोहित गाडीतून निघून गेला. गाडीकडे बघत बघत सचिनने त्याची सायकल स्टॅण्डवरून काढली व घराच्या दिशेने निघाला. रोहितची गाडी, मोबाईल व बाकी थाट त्याच्या डोक्यात फिरत होता. पण, हळूहळू या सर्व गोष्टीपेक्षा पोटातल्या भुकेची जाणीव जास्त होऊ लागली. सायकलने आपोआप वेग घेतला. घरी पोचल्यावर तो हात पाय धुऊन पाटावर जेवायला बसला. सुनंदाबाईंनी त्याच्या आवडीची भाजी केली होती. गरमागरम पोळीबरोबर आईशी गप्पा करत मस्त जेवण झालं होतं. मोबाईल–गाडीची घालमेल पार शमली होती. बाहेर अंगणातल्या झुल्यावर बसून तो पेरूच्या झाडावर पोपटांची गंमत बघत बसला. रोहितकडे असेल का असा झुला? पेरूची झाडं किती असतील? मनात पुन्हा विचारचक्र सुरू झालं!

इकडे रोहित घरी पोचल्यावर फ्रेश होऊन डायनिंग टेबलवर येऊन बसला. घर संभाळणाऱ्या मावशींनी कॅसरोल मध्ये सर्व जेवण ठेवून दिले होते. आपल्या हाताने वाढून घेऊन रोहित ते बेचव जेवण जेवला. रोजच असे न आवडणारे जेवण त्याला जेवावे लागे. जेवल्यावर मम्मी घरी येईपर्यंत वेळ कसा घालवायचा याचा कंटाळवाणा विचार करत राहिला. टीव्हीवरचे कार्टूनपण बोअर व्हायचे. एवढ्या मोठ्या फ्लॅटमध्ये त्याला फार एकटे एकटे वाटत असे. मम्मीला त्याने कितीदा ''घरी रहा ना गं माझ्या सोबत'' असे लाडाने, हट्टाने, रडत रडत म्हणून पाहिले. पण मम्मीला, तिचे एनजीओ, लेडीज क्लब, मंडळं, त्यांच्या मिटींग्ज, कार्यक्रम, पार्ट्या यातून फुरसत नसे! त्यामुळे रोहितला शाळेतून घरीच यावेसे वाटत नसे. घराची ओढ अजिबात नव्हती. एवढे सर्व वैभव, सुख–सोयी असूनही तो कायम उदास असायचा.

त्या दिवशी शाळा सुटल्यावर रोहित व सचिन नेहमीप्रमाणे गाडीची वाट बघत होते. तेवढ्यात ड्रायव्हरचा फोन आला की गाडी खराब झाली आहे व रिपेअर व्हायला वेळ लागेल. सचिन रोहितला म्हणाला, ''इथं थांबण्यापेक्षा चल आपण माझ्या घरी जाऊ.'' रोहित तर पटकन तयार झाला. ड्रायव्हरला सचिनकडे



यायला सांगून रोहित त्याच्याबरोबर डबलसीट बसून निघाला. गाडीपेक्षा सायकलवर त्याला मस्त वाटले.

सचिनच्या आईला रोहितबद्दल ऐकून माहीत होतेच. ती त्याला म्हणाली, ''आता तूही सचिनबरोबर इथेच जेवून घे!'', रोहितला भूक तर लागलीच होती. तरी थोडे आढेवेढे घेत तो जेवायला पाटावर बसला.

''तुम्ही असे रोज पाटावर खाली बसून जेवता?'' रोहितने आश्चर्याने विचारले.

''हो रे, आमच्याकडे टेबलपण नाही, व टेबल ठेवायला हॉलपण नाही.'' सचिन नाराजीने म्हणाला.

सुनंदाबाईनी ताट वाढून पुढ्यात ठेवले तेव्हा रोहित ते भरलेले ताट बघतच राहिला. ताटात ताजे लोणचं, भरल्या वांग्याची रसदार भाजी, वाटीत वरण, साखरांबा व गरमागरम भाकरी अन् चिरलेला कांदा! रोहितला ते पंचपक्वान्नाचे जेवण वाटले. तो जेवल्यावर म्हणालाच, ''काकू, काय मस्त जेवण होतं! आजपर्यंत मी एवढा कधीच जेवलो नाही. तुम्हीच रोज स्वयंपाक करता?'' रोहितने न राहून विचारले.

''हो'' सुनंदाबाई हसल म्हणाल्या.

''एवढं सगळं तुम्ही एकट्या करता? आणि रोज गरम भाकरी करून सचिनला वाढता?'' रोहितने विचारले.

''हो. त्याला अशीच गरम भाकरी आवडते. नाहीतर तो रुसून बसतो. अन् जेवत नाही.'' सुनंदाबाई कौतुकाने सांगत होत्या. ''आणि तो शाळेतून येतो तेव्हा तुम्ही रोज घरी असता?'' रोहितचे प्रश्न संपत नव्हते.

''सचिन शाळेतून येतो तेव्हा मी घरीच असते. मी दिवसभराची नोकरी करत नाही. पार्टटाईम करते.'' सुनंदाबाई म्हणाल्या. रोहितला हे सगळेच नवीन होते. ते घर, घरासमोर छोटेसे अंगण, अंगणातले पेरूचे झाड, तो बढीया झुला – काय मस्त आहे हे सगळंच! आणि मुख्य म्हणजे शाळेतून घरी आल्यावर आई घरी असणं... यासारखी मजाच नाही! हे सर्व पाहून रोहित तर भारावून गेला होता. निघताना तो सचिनला म्हणाला, ''मित्रा, केवढा श्रीमंत आहे तू. माझ्याकडे यातले काहीही नाही!''

रोहितने आपल्याला श्रीमंत म्हटलं म्हणून सचिन आश्चर्यचकित झाला. त्याची आई मात्र समाधानाने हसली. !

**संपर्क :** ९४२१७८६३८१

# साल सुगीचे येऊ दे...

■ संजय वाघ



माझा शेतकरी बाप
राबराबतो शेतात
ऊन, वारा, पावसाची
भीती उरे ना मनात

मशागतीत शेताच्या
घाम मातीत गाळतो
काळ्या ढेकळांच्या संगे
स्वप्न हिरवे पाहतो

मेघ दाटल्या आभाळी
कधी हसतो, रुसतो
धडधड काळजाची
उगी का रे वाढवतो

पावसाच्या हजेरीने
रान लागते बोलाया
पेरणीच्या खुशीमध्ये
बाप लागतो डोलाया

औत चालते शेतात
दाणा एकेक पेरत
साल सुगीचे येऊ दे
सांगे दाण्याच्या कानात

बळीराजाची फिर्याद
बीज ठेवते ध्यानात
करी बीजाचा रे कोंब
अशी ताकद पाण्यात

वारकऱ्याच्या रूपात
पिके डोलती पाहुनी
हिरव्या पंढरीत बाप
नाचे विठ्ठल होऊनी

निसर्गाच्या कृपेवर
मुखी पडतो रे घास
फुलू दे ना आयुष्यात
धनधान्याची रे रास



संपर्क : ९९२२९०४०७२



मूळ लेख – पीयूष सक्सेरिया

मराठी अनुवाद– प्रसाद कुलकर्णी

धकाधकीच्या, गर्दीच्या शहरांत करड्या रस्त्यांवर वाहतूक सिग्नलवरील 'झेब्रा क्रॉसिंग'चे पांढरे पट्टे हे नैसर्गिक अधिवासात राहणाऱ्या प्रत्यक्षातील झेब्रा या अतिशय सुंदर प्राण्यापेक्षा खूपच वेगळे असतात! कुठल्याही प्रकारची विशेष व्यवस्था नसली, तरी 'झेब्रा क्रॉसिंग' हा शहरांमध्ये सर्वांना अगदी परिचित असलेला असा एक भाग असतो. यावरून कुठल्याही जातीचे, धर्माचे, गरीब, श्रीमंत, तरुण, ज्येष्ठ स्त्री-पुरुष 'सुरक्षित'पणे रस्ता ओलांडू शकतात. दुर्दैवाने, आपण या 'झेब्रा क्रॉसिंग'चा योग्य तो सन्मान राखत नाही.

**'झेब्रा क्रॉसिंग'ची कल्पना कुठून आली ?**

काळ्या डांबरी रस्त्यांवरील ठळक पांढऱ्या पट्ट्यांना मुळात 'झेब्रा क्रॉसिंग' म्हणत नसावेत. इंग्लंडमध्ये १९३०च्या दशकात पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी ही सुविधा प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात आली होती. लंडनमध्ये वाहतुकीचा पसारा मोठा होता. पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी कुठल्याही प्रकारची विशिष्ट जागा अथवा व्यवस्थात्मक मार्ग नव्हता. एके दिवशी, एका ब्रिटिश राजकारणी व्यक्तीने प्रायोगिक तत्वावर सुरू असलेल्या या रस्ता ओलांडण्याच्या उपक्रमाला भेट दिली. त्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्तपणे 'झेब्रा क्रॉसिंग' असे संबोधले! हेच नाव पुढे कायम राहिले! जगभरात आज 'झेब्रा क्रॉसिंग'ना अतिशय चांगले ओळखले जाते. रस्ता ओलांडणाऱ्या इतर उपक्रमांनाही त्यांच्यामुळे प्रेरणा मिळाली आहे. स्पेनमधील एका शहराने पांढरे पट्टे बदलून त्या जागी गायींवर दिसणाऱ्या काळ्या-

# झेब्र्याने खरेच रस्ता ओलांडला का !





पांढऱ्या ठिपक्यांसारखे ठिपके देण्याचा निर्णय घेतला. त्यांना 'काऊ क्रॉसिंग' असे संबोधण्यात आले. या भागातील गायींचे महत्व यांतून अधोरेखित करण्यात आले. हाँगकाँगमध्ये पिवळ्या-काळ्या ठिपक्यांचे नमुने स्वीकारण्यात आले. त्यांना 'टायगर क्रॉसिंग' असे संबोधले. ऑस्ट्रेलियामध्ये, 'झेब्रा क्रॉसिंग' एका छोट्या गतिरोधकाच्या पट्टीवर लावण्यात आले. ऑस्ट्रेलियात सहज आढळून येणाऱ्या, कांगारूंप्रमाणे पिलांना पुढील पिशवीत ठेवणाऱ्या वूम्बट या प्राण्यावरून याला लाडाने 'वूम्बट क्रॉसिंग' असे संबोधले जाते.

झेब्रा या प्राण्यावरून मूळ 'झेब्रा क्रॉसिंग' हे नाव पडले, याची शक्यता कमी वाटत असली, तरी झेब्रा या प्राण्याच्या अंगावर पट्टे का आले? या पट्ट्यांमुळे झेब्रा ठळक उठून दिसतो. अगदी सिंहालाही तो स्पष्ट दिसतो. असे दिसण्यासाठी इतका का तो खटाटोप? झेब्र्याच्या तीन प्रजाती आहेत. त्यांच्या सर्व अधिवासांत त्यांना त्रस्त करून सोडणाऱ्या आणि त्यांच्या मृत्यूलाही कारणीभूत ठरतील अशा घोडामाश्या (Horse flies) आणि त्सेत्से माश्या (tsetse flies) आढळतात. झेब्रा त्यांचा सामना कसा करीत असेल! संशोधकांनी एक प्रयोग केला. त्यात त्यांनी घोड्यांना झेब्र्याच्या अंगावर जसे पट्टे असतात, त्या रंगाचे कपडे घातले. संशोधकांना आढळले, की घोडामाश्या या सातत्याने अंगाजवळ यायच्या; मात्र काळ्या-पांढऱ्या पट्ट्यामुळे त्यांचा गोंधळ उडायचा. या माश्या कधीही अंगावर प्रत्यक्ष आल्या नाहीत किंवा आल्या, तरी अनामिक ठिकाणी धडकत असत! संशोधकांना वाटले, की घोडामाश्या आणि त्सेत्से माश्यांना दूर ठेवण्यासाठीच झेब्र्याच्या अंगावर काळ्या-पांढऱ्या रंगाचे पट्टे असावेत!

**संपर्क : ८७९३००२८१०**

सुहास बारटक्के

भाग ६

# खोडदा आणि होरं

‘‘चल, आज आपण वाळूतल्या गमतीजमती पहायला जाऊ’ असं म्हणत बाबूल सकाळीच नीलच्या घरी प्रवेश करता झाला. नीलच्या घरी आज नाश्त्यासाठी कोकणातले खास भाजणीचे वडे केले होते. दोघांनीही पोटभर वडे हादडले. पाण्याच्या बाटल्या व टोप्या घेऊन दोघे समुद्र किनाऱ्याकडे निघाले. जाताना वाटते एक नदीसारखा दिसणारा मोठा पाण्याचा प्रवाह होता.

‘‘ही कोणती रे नदी?’’ नीलनं विचारलं ‘‘ही नदी नव्हे. याला आम्ही खोडदा असं म्हणतो. इंग्रजीत यालाच लगून म्हणत असावेत.’’

‘‘हां...हां, लगून्स...म्हणजे समुद्राच्या लाटांमुळे समुद्रकिनाऱ्यावर तयार होणारी खाऱ्या पाण्याची तळी. भरतीच्या वेळी समुद्राचं पाणी या खड्ड्यासारख्या भागात वाळूत अडकून रहातं. ओहोटी आली की समुद्राचं पाणी समुद्राकडे परत जातं आणि हे खड्ड्यात अडकलेलं पाणी तिथेच रहातं. त्यालाच लगून्स म्हणतात. याच वेळी समुद्राला जोडलेल्या एखाद्या पाटाप्रमाणं असलेल्या भागातून दूरवर वाहून जातं. हा पाण्याचा प्रवाह खोडदा म्हणून ओळखला जातो.’’ नीलनं अधिक माहिती पुरवली



आणि ते खोडद्यावर असलेल्या नाजूक छोट्या लाकडी पुलावरून पलीकडे असलेल्या समुद्राकडे जाऊ लागले.

'याला साकव म्हणतात. बांबूच्या काठ्या वापरून हा पूल तयार करतात. पावसाळ्यात कधी कधी वाहून जातो. पुन्हा तयार करतात. बांबूला बांबू जोडतात.''

बाबूलचं हे बोलणं ऐकून नीलला थोडी भितीच वाटली. पण त्या डुगडुगणाऱ्या पुलावरून पलीकडे जाताना थोडी गंमतही वाटली.

दोघे आता शुभ्र वाळूच्या ढिगाकडे पोहोचले. ओहोटी असल्यानं समुद्राचं पाणी खूप मागे गेलं होतं इथल्या सुक्या वाळूत घोट्यापर्यंत पाय बुडत होते. एकेक पाऊल टाकताना मजा वाटत होती पण चालण्याचा वेग मात्र खूपच कमी झाला होता. मग त्या दोघांनी थोडं समुद्राच्या पाण्याजवळ जाण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांना ओलसर वाळूत थोडं वेगानं चालता येऊ लागलं. दोघे निघाले होते निवतीच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या भोगवे किनाऱ्याच्या दिशेनं! दोन अडीच किलोमीटर चालल्यावर त्यांना दूरवर किनाऱ्याच्या उजव्या टोकाला एक मोठी वाळूची टेकडी दिसू लागली. दोघेही मग ओल्या वाळूतून बाहेर पडून त्या कोरड्या वाळूच्या डोंगराकडे निघाले.

''इथंच एका टोकाला होरं आहे'' बाबूल म्हणाला.

''होरं म्हणजे नक्की काय रे?''

''चल दाखवतो तुला. समुद्राच्या पोटातल्या वाळूत जसे खड्डे किंवा विवरं असतात ना, तसं किनाऱ्यावर वाळूच्या ढिगातसुद्धा असे खड्डे असतात. वाऱ्यामुळे त्यात वाळू उडून पडू लागते व सारं विवर त्या वाळूनं भरून जातं. पण ही  वाळू घसरणारी असते. खालची आधारभूत घट्ट वाळू वा जमीन तिथं नसतेच! असते ती नुसती कोरडी भुसभुशीत वाळू. मग या ढिगावर आपण चढू लागलो ना, की आपोआप वाळूत गाडले जाऊ लागतो. हळूहळू वाळूत गडप होतो.''

''बापरे, मग इथं धोक्याचा इशारा देणारा बोर्ड का लावत नाहीत?'' नीलनं विचारलं.

'खूप चांगली सूचना आहे तुझी. पण होरं असणारं ठिकाण काही वेळा बदलत जातं. कुठे कुठे बोर्ड लावणार तरीपण आपण तुझ्या आजोबांना सांगून ग्रामपंचायतीमार्फत




इथे बोर्ड लावायला नक्की सांगूया.'' बाबूलनं सांगितलं. दोघे आता त्या वाळूच्या ढिगापाशी आले. तेवढ्यात त्या वाळूच्या ढिगाच्या मागच्या बाजूनं त्यांना एका गायीच्या हंबरण्याचा आवाज आला. त्यांनी दुरूनच धावत मागे जाऊन पाहिलं तर एक गाय बिचारी त्या वाळूत अडकली होती. आपले पाय हलवून बाहेर येण्याचा प्रयत्न करत होती पण त्यामुळे ती जास्तीत जास्त वाळूत अडकत होती.

नील व बाबूलनं तिला वाळूतून बाहेर काढायचे ठरवलं. पण कसं काढणार? उत्साही नील थोडा पुढे जाताच त्याचे पायही वाळूत अडकले. त्याला बाहेर येताच येईना. बाबूलनं मग धावपळ करून कुठून तरी एक लांब बांबू मिळवला आणि त्याला पकडून नील कसाबसा परत बाबूलकडे आला. आता त्या गायीला कसं सोडवायचं, हा प्रश्न होताच. बाबूलला दूरवर समुद्राच्या जवळ एक होडी दिसली. दोघेही होडीकडे धावले. आता कुणीही नव्हतं पण त्यांना एक लांब सुटी फळी होडीत ठेवलेली पहायला मिळाली. त्यांनी ती फळी आणि होडीतलाच दोरखंड सोबत घेतला व ते गायीपाशी आले. त्यांनी त्या गायीच्या दिशेनं वाळूत रुंद फळी अंथरली. त्यावरून पुढे जात त्यांनी दोरखंड त्या गायीच्या शिंगाना बांधला व फळी वाळूत रुतायच्या आत ते पुन्हा सुरक्षित जागी परतले. मग जोर लावून त्यांनी त्या गायीला ओढायला सुरुवात केली. जवळच असलेल्या सुरुच्या झाडाला उंचावर दोरखंड अडकवला. गाय हळूहळू हालचाल करू लागली. कशीबशी वाळूशी झगडत तिने आपले पाय बाहेर काढले आणि फळीवर चालत ती सुरक्षित ठिकाणी आली. बाबूल व नीलनं टाळ्या वाजवून स्वतःचच अभिनंदन केलं. मात्र उद्याच्या उद्याच इथं बोर्ड लावून आणि कुंपण घालून हे होरं असलेलं ठिकाण बंदिस्त करायचं ठरवलं.

सुदैवानं घरी येऊन ही हकीकत नीलच्या आजोबांना

कथन करताच त्यांनीही लगेच ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन अर्ज दिला. गाय शोधत आलेल्या त्या गायीच्या मालकानंही या कामी पुढाकार घेतला. दुसऱ्या दिवशी खरोखरच ते होरं कुंपणात बंदिस्त करायचं काम सुरू झालं.

नील व बाबूलचंही कौतुक झालं. आता कुंपण घालून तिथं बोर्ड लावलाय 'धोका. वाळूचं होरं. कोणीही या टेकडीवर चढू नये.' दुसऱ्या दिवशी नील व बाबूल हे काम पाहायला म्हणून सायंकाळी फिरत फिरत पुन्हा त्या होऱ्याजवळ आले तर त्यांना थोड्या अंतरावर वाळूत आणखी एक कुंपण घातलेले दिसले. 'हे काय रे बाबूल?'

''हे, ऑलव्हिरिडले जातीच्या कासवाचं संरक्षित केलेलं घरटे. याच काळामध्ये कासवं रात्रीच्या वेळी इथं अंडी घालायला येतात. वाळूत खड्डा करून अंडी घालून परत समुद्रात जातात मग ही अंडी माणसं तसेच कोल्हे, कुत्रे यांच्यासारखे प्राणी पळवतात व खातात. त्यामुळे कासवांची संख्या कमी होऊ लागली. आता सरकारनं त्यावर बंदी घातली आहे. आमच्या गावात कासवमित्र तयार केले आहेत. मीसुद्धा आहे त्यात. आम्हांला समुद्रकाठी फिरताना जर कासवांची अंडी दिसली तर आम्ही लगेचच त्याची मोजणी करतो. नोंद करतो आमच्या मुख्य संरक्षकाला कळवतो. अंड्याभोवती कुंपण घालून अंडी संरक्षित करतो. आळीपाळीनं त्यावर पहारा करत अंड्यातून पिल्ले बाहेर आली की ती आपोआप समुद्राच्या दिशेनं तुरुतुरु पळू लागतात. त्या दिवशी सगळे एकत्र जमतो तिथं आणि कासव महोत्सवही साजरा करतो. साधारणपणे ५० ते ६५ दिवसांनंतर अंड्यांतून पिल्ले बाहेर येतात.''

''खूप छान काम आहे रे....मीपण काम करीन त्यासाठी'' नील भारावून जात म्हणाला व दोघेही पुन्हा घराकडे निघाले.

''नील उद्या आपण एक धाडस करूया?'' ''कोणतं रे?''


''सकाळी लवकर उठून आपण जुनं दीपगृह पहायला जाऊया? मी बाबांना विचारतो.''

''हो, मी तेच तुला सुचवणार होतो. चल उद्याच जाऊ.''


दोघेही उड्या मारत आपापल्या घरी गेले.

**(क्रमशः)**

**संपर्क : ९४२३२९५३२९**



मनोज बोरगावकर



# 'जिम कॉर्बेट' बाबाची गोष्ट!

मित्रांनो, मी आज तुम्हांला गढवाल-कुमाऊँमध्ये राहिलेल्या एका गोऱ्या साधूची गोष्ट सांगणार आहे! पण हा साधू खूप खूप वेगळा होता. त्या भागात राहणाऱ्या लोकांनी त्याला गोरा साधू (अर्थात सफेद साधू)हे नाव मोठ्या प्रेमाने दिलं होतं. हा साधू आहे जंगल- निसर्ग वाचणारा... पानाची-फुलांची -प्राण्यांची भाषा समजून घेणारा. हुबेहूब वाघासारखा आवाज काढून वाघाला आपल्याजवळ बोलावून घेणारा आणि चक्क वयाच्या अकराव्या वर्षी बिबट्याची शिकार करणारा... जिम कॉर्बेट नावाच्या या महान शिकारी लेखकाला तिथले आदिवासी गोरा साधूच म्हणायचे! कारण कितीतरी नरभक्षक वाघांना मारून या माणसाने अक्षरशः हजारो लोकांचे जीव वाचवले होते. नरभक्षक वाघाच्या भीतीने ओस पडलेल्या अनेक गावांना या माणसाने आपल्या जीवावर उदार होऊन हिमतीने पुन्हा वसवले होते. आपण आज फोनवरच्या कॉल्सविषयी बोलतो ना? हा माणूस शिकार करताना पक्ष्यांचे प्राण्यांचे इशारे ज्याला कॉल्स म्हणतात, ते सहजी ओळखायचा. म्हणजे बघा

आपले फोनचे जसे नेटवर्क असते ना.... तसे त्यांचे या आवाजाचे नेटवर्क होते. आहे ना हे किती अद्भुत !

वाघ हा खूप रुबाबदार प्राणी आहे असे आपण नेहमी म्हणतो पण तो किती रुबाबदार आहे हे समजून घेण्यासाठी जिम कॉर्बेटची पुस्तकं वाचलीच पाहिजेत. पाळीव प्राण्यांवर किती प्रेम करावे हेदेखील जिम कॉर्बेटकडून शिकण्यासारखे आहे. मॅगॉग नावाच्या त्याच्या कुत्र्यानेचं त्याला शिकवले होते की घनदाट झाडीतून जाताना झोपलेल्या जनावराच्या अगदी जवळून न जाण्याची खबरदारी घेतली पाहिजे कारण ते प्राणी दचकून जीवघेणा हल्ला ही करू शकतात. मॅगारूग आणि रॉबिन नावाच्या त्याच्या कुत्र्याने त्याला जंगल वाचायला बरीच मदत केली. पण त्यांची भाषा जिमने समजून घेतली हेदेखील मोलाचे.

आता कॉर्बेट बाबाने वाघांबद्दल सांगितलेली आणखी एक गोष्ट सांगू का (अर्थात त्याच्या पुस्तकातून) पोट भरलेला वाघ माणसाकडे ढुंकूनसुद्धा बघत नाही... त्याला तर माणसांचा वासपण आवडत नाही.... म्हणून पोट भरलेले वाघोबा तुमच्या बाजूने जरी गेले ना तर ते तुमची दखलपण घेणार नाहीत. इतके तुम्ही वाघांच्या दृष्टीने बेदखल आहात. तुम्हांला पुस्तकं वाचायची असतील तर अ, ब, क, ड, ई अशी बाराखडी शिकावी लागते हो ना? तसंच तुम्हांला जंगल, निसर्ग, प्राणी वाचायचे असतील तर त्याचीही एक बाराखडी आहे आणि ती बाराखडी जिम कॉर्बेट बाबाची पुस्तकं वाचून नक्की शिकता येते हा माझा अनुभव आहे बरं का! आणि ती पुस्तकं कोणती हेदेखील मी शेवटी सांगणारच आहे.

प्राणी शिकार करतात ती केवळ पोटाची भूक भागवायची म्हणून! त्यासाठी दुसरा कोणता पर्याय उपलब्ध नाही म्हणून! पण आपण माणसं आपली भूक तर भागतच नाही... सकाळी जेवताना आपल्या डोक्यात दुपारच्या, संध्याकाळच्या जेवणाचे विचार येत राहतात. एकाच पिढीला नाही तर सात पिढ्यांना पुरावे इतका आपला कमवायचा हव्यास असतो. कसे वागावे हे सगळे नियम माणसाने लिहून ठेवलेले असले तरी आपण सतत ते नियम मोडत जगत असतो. पण जंगलाचे किंवा निसर्गाचे कोणतेही नियम लिहिलेले नसले तरी प्राणी मात्र किती शहाण्यासारखी वागत असतात. हा अनुभव आपल्याला जिम कॉर्बेटच्या पुस्तकांच्या पानापानांतून येत राहतो.

जंगलातल्या इतक्या अद्भुत गोष्टींचा खजिना जिम कॉर्बेट बाबाकडे होता की बास रे बास.

जिम कॉर्बेटच्या पुस्तकातले दोन उतारे मी तुमच्या समोर ठेवतो म्हणजे प्राणी कसे असतात, कसे वागतात, विनाकारण हिंसा करत नाहीत हे तुमच्या लक्षात येईल आणि उभ्या आयुष्यात तुम्ही कोणाला 'तू जनावरासारखा का वागतो रे?' असे कधीही म्हणणार नाही! ते दोन उतारे असे...

''दोन वर्षांची पुतळी व तीन वर्षांचा पुनवा शुक्रवारी दुपारी हरवले होते व सोमवारी संध्याकाळी पाच वाजता गुराख्याला सापडले होते. म्हणजे जवळजवळ सत्त्याहत्तर तास ते जंगलात होते. त्या जंगलात वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी व पक्षी होते. अगदी वाघसुद्धा! पण यापैकी कोणीही त्यांना बघितलं नसेल किंवा हुंगल नसेल असे तर होऊच शकत नाही! पण तरीही एवढ्या तासांनंतर ती त्यांच्या आईबाबांना सापडली तेव्हा त्यांच्या अंगावर दाताचा किंवा नखाचा साधा ओरखडाही नव्हता!''

किती सुंदर आहे ना हे मुलांनो.. इतका वेळ जंगलात हरवलेल्या त्या दोन छोट्या मुलांना एकाही प्राण्याने इजा करू नये! किती शहाणे आहेत ना हे प्राणी!

जिम कॉर्बेट वाचला नसता तर प्राण्यांचे हे शहाणपण आपल्याला समजले तरी असते का? म्हणूनच तुम्हांला म्हणालो ना कॉर्बेट नावाचा हा गोरा साधू आपल्याला निसर्ग- प्राणी वाचायची जणू बाराखडीच शिकवून जातो!

कॉर्बेट बाबाच्या पुस्तकातला आणखी एक छोटासा उतारा तुमच्यासमोर ठेवतो.

''एकदा एक वाघीण एका छोट्या मुलाकडे दबा धरून जाताना मी पाहिलंय. वाघिणीला पाहिल्यावर ते मूल रडायला लागलं. त्यानंतर आपलं दबा धरणं सोडून वाघीण उघड्यावर आली. त्या मुलाच्या अगदी जवळ गेली. नाकानं त्या मुलाचा वास घेतल्यासारखे केलं आणि ती वाघीण आल्या वाटेनं निघून गेली!

जिम कॉर्बेटने डोळ्याने पाहिलेला हा प्रसंग वाचकांना



सांगितला. असे किती तरी प्रसंग त्याच्या पुस्तकात आहेत मित्रांनो. जिम कॉर्बेट महान शिकारी होता पण एकदा जंगल – प्राणी यांच्याशी जिव्हाळ्याचे नाते झाल्यावर त्याने फक्त नरभक्षक वाघांच्याच शिकारी केल्या; तेही केवळ जीव मुठीत धरून बसलेल्या माणसांचे प्राण वाचवायचे म्हणून.

मग तुम्ही म्हणाल 'वाघ नरभक्षक का होतात?' ते माणसाची शिकार का करतात? याचेही इतकं छान उत्तर जिमने देऊन ठेवलंय. तो म्हणतो 'काही विपरीत परिस्थितीतच वाघ किंवा प्राणी नरभक्षक होतात.' दहा पैकी नऊ वेळा वाघ नरभक्षक होतो ते केवळ तो जखमी झाल्यामुळे नेहमीचा शिकार करण्यासाठीचा वेग आणि चपळता तो गमावून बसलेला असतो. पोटाची भूक तर सहन होत नाही मग तो माणसाची शिकार करतो ते नाईलाज म्हणून. कधी तर तो इतका म्हातारा झालेला असतो की प्राण्यांची शिकार करण्याचे सामर्थ्यच त्याच्याकडे शिल्लक उरत नाही. अशा वेळी माणसं त्याची अगदी सॉफ्ट टार्गेट ठरतात. आता वाघाला जखम कशी होऊ शकते तर कधी शिकाऱ्याने निष्काळजीपणे मारलेल्या गोळीमुळे तर कधी साळिंदराची शिकार करताना बेसावध राहिल्यामुळे त्याचे काटे वाघाला जखमी करतात. वाघाचे शिकारीचे मूळ अवयव म्हणजे त्याचे दात आणि वाघनखं आणि त्याचा अविश्वसनीय असा वेग. पण एखादा दात पडला असेल, नखं झिजली असतील किंवा म्हातारपण आलेलं असेल तेव्हा वाघ नैसर्गिकरित्या शिकार करू शकत नाही. नैसर्गिक शिकार म्हणजे जंगलातले प्राणी बरं का आणि मग तेव्हाच तो नरभक्षक बनतो. जंगली प्राण्यांचे नरभक्षक बनणे हे जास्तीत जास्त वेळा अपघातानेच होते! केवढा अभ्यास केलाय ना जिम कॉर्बेटने या सगळ्याचा! बरं

हे सगळं केवळ पुस्तकी ज्ञान नाही तर प्रत्यक्ष जंगलात राहून; अशा अनेक नरभक्षक वाघांच्या शिकारी करून त्यांनी वाचकांसमोर ठेवलेला फार मोठा खजिनाच आहे! मुक्तेश्वरच्या चोवीस लोकांचा बळी घेणाऱ्या वाघिणीचे उदाहरण जिम आपल्या समोर ठेवतो. साळींदराची शिकार करताना आठ नऊ इंचाचे काटे रुतून व एक डोळा आंधळा झाल्यामुळे ती वाघीण कशी नाईलाजास्तव नरभक्षक झाली हे जिमने वाचकांना सप्रमाण सिद्ध करून दाखवले. वाघ हा निसर्गाच्या चक्रात किती महत्त्वाचा प्राणी आहे हे सांगताना तो त्याच्याविषयी खूप प्रेमाने बोलतो! म्हणून अर्धवट ज्ञानावर वाघांविषयी जेव्हा 'क्रूर प्राणी' किंवा 'रक्तपिपासू प्राणी' असे शब्द वापरले जातात तेव्हा जिमला ते अजिबात आवडत नाही. म्हणून वाघ, जंगल, प्राणी समजून घ्यायचे असतील तर तुम्हांला जिमच्या पुस्तकांना कडकडून मिठी मारावी लागेल!

जिम कॉर्बेटने अनेक नरभक्षक वाघ मारले, अगदी चारशे चारशे माणसांचे बळी त्या वाघांनी घेतले होते. अशा वाघांना या माणसाने स्वतःचा जीव धोक्यात घालून मारले. जीव मुठीत धरून जगणाऱ्या हजारो लोकांना मोकळा श्वास त्या काळात घेता आला तो जिम कॉर्बेटच्या धाडसीपणामुळेच!

आपला शेवटचा नरभक्षक वाघ मारल्यानंतर जिम कॉर्बेट अगदी नम्रपणे लिहून ठेवतो, ''मला ज्या गोष्टी तुम्हांला सांगायच्या होत्या त्या आता सांगून झाल्या आहेत. या नरभक्षक वाघिणीच्या मृत्युबरोबरच माझी वाघांना मारण्याची कारकीर्द आता संपली आहे. बरीच वर्षे हा धोकादायक खेळ मी खेळलो. कधी कधी या खेळात माझाच बळी जाण्याचे प्रसंगदेखील आले. पण प्रत्येक वेळी मी जिवंत आणि आपल्या पायांवर चालत आलो. माझ्या एका गोळीमुळे एका जरी माणसाचा जीव वाचला असेल तर ते माझ्यासाठी फार मोठे बक्षीस आहे.!''

बघा किती वेगळा विचार करतो ना हा गोरा साधू! स्वतःच्या जीवाची पर्वा त्याला अजिबात नाही पण दुसऱ्यांचा जीव वाचवता आला याचा मात्र खूप खूप आनंद. अशा या जिम कॉर्बेटची पुस्तकं आपण वाचली ना की झाडाझुडपांकडे, पानाफुलांकडे जंगल-प्राण्याकडे बघण्याचा आपला दृष्टिकोनच बदलून जातो!

जिम म्हणतो, ''जंगलातले सगळेच जीव आनंदाने जगत असतात. पक्ष्यांच्या थव्यातला एखादा पक्षी किंवा कळपातला एखादा प्राणी मांसभक्षी प्राण्याने उचलला तर बाकी प्राणी आज आपली वेळ आली नव्हती या आनंदात मशगूल राहतात.'' तुम्हांला मी होमवर्क म्हणून त्याच्या पुस्तकाची नावं सांगणार आहे! अरे हो पण रविवारच्या सुट्टीत गृहपाठ तर तुम्हांला तर अजिबात आवडत नाही ना! पण हा गृहपाठ आयुष्यभर करण्यासाठी आहे आणि एकदा हा करायला लागलात की जीवनाची परीक्षासुद्धा खूप चांगल्या मार्कांनी पास व्हाल!

आणि ही पुस्तकं वाचताना वर मी सांगितलेल्या मनोरंजक गोष्टींचा खजिनाच तुमच्या हाती लागलेला असेल! अजिबात कंटाळा न येणारा हा गृहपाठ करणार ना तुम्ही? आपण सकाळी उठून पाढे पाठ करतो त्यासारखं जिमला जंगल पाठ व्हायचे. हा इतका धाडसी शिकारी होता की एकदा त्याने नरभक्षक वाघाचे आमिष म्हणून स्वतःलाच ठेवले होतं. जीवघेणा हल्ला केलेला नरभक्षक वाघ मारल्यानंतर तो किती रुबाबदार होता याचे खूप वेळा कौतुक करणारा जिमसारखा शिकारी आज शोधूनही सापडणारा नाही.

२५ जुलै १८७५ रोजी एडवर्ड जिम कॉर्बेट भारतात नैनिताल येथे जन्म झाला आणि १९५५ मध्ये या महान शिकारी लेखकाचे केनियात निधन झाले.

**संदर्भ :**



१) भाग्यवान वाघ आणि इतर काही चित्तथरारक शिकारी.
२) शिकाऱ्याचे मित्र
३) कुमाऊँचे नरभक्षक
४) रुद्रप्रयागचा नरभक्षक वाघ
५) माझा भारत
६) जंगल ट्री टॉप्स
७) टेम्पल टायगर
८) जंगल लोर


**संपर्क - ९८६०५६४१५४**

# चला चित्र रंगवूया...!!!

रेश्मा बर्वे

हत्तीदादाची शाळा सुरू झाली. शाळेच्या पहिल्या दिवशी तो जय्यत तयारी करून निघाला. त्याच्याबरोबर त्याचा एक छोटा मित्रपण होता. कोण बरं असेल तो मित्र ? चित्र पूर्ण करून छानसे रंगवा.






अच्युत गोडबोले

भाग ६

# किरकोळ विक्रीच्या (Retail) क्षेत्रात AI

पूर्वीच्या जमान्यात लोक किराणा मालाच्या दुकानात जायचे आणि विकत घ्यायच्या वस्तूंची यादी वाचून दाखवायचे. मग दुकानदार साऱ्या वस्तू आणून द्यायचा. मग एका कागदावर खरेदी केलेल्या वस्तूंची यादी आणि प्रत्येक वस्तूसमोर किंमत लिहायचा. मग साऱ्या किमतींची बेरीज केली जायची. नंतरच्या काळात सुपरस्टोअर्स आले आणि त्यात कॉम्प्युटर्स आणि बार कोड स्कॅनिंगची यंत्रणा दिसायला लागली.

गेल्या काही वर्षांमध्ये ऑनलाईन शॉपिंग वाढायला लागलं. लोकांना घरबसल्या वेगवेगळ्या वस्तू, त्यांच्या किमती, त्यांच्या खरेदीवर चालू असणाऱ्या ऑफर्स, इतर ग्राहकांनी त्या वस्तूला दिलेलं रेटिंग, रिव्यूज् आणि कमेंट्स असं सगळंच स्मार्टफोनवर दिसायला लागलं. एका क्लिकवर त्यांना हव्या त्या वस्तू खरेदी करायला येऊ लागल्या. ऑनलाईन शॉपिंगमुळे प्रत्यक्षातली दुकानं मागे पडायला लागली. कित्येक दुकानं बंदही व्हायला लागली.

ऑनलाईन रिटेलच्या यशामध्ये AI चा महत्त्वाचा वाटा आहे. एखादा ग्राहक ऑनलाईन खरेदी करण्यासाठी वेबसाईटवर गेला की त्याच्या आवडीनिवडी जाणून घेणं AI मुळेच शक्य होतं. AI मुळे ग्राहकाला नेमकं काय हवं आहे, त्याचा खरेदीचा नेमका काय उद्देश आहे ते आपल्याला कळू शकतं. एकदा त्याला नेमकं काय हवं आहे ते समजलं की त्याला हव्या असणाऱ्या वस्तू (त्यानं तपशीलवार वर्णन करत न शोधताही) त्याला सुचवता येतात. यासाठी त्याची अलीकडची ब्राऊजिंग हिस्टरी मोलाची ठरते. त्याला सुचवलेल्या गोष्टी या त्याच्या वैयक्तिक गरजेप्रमाणे,

आवडीप्रमाणे असतात. अशाच प्रकारे AI वापरत प्रत्येक ग्राहकाला वैयक्तिक गरजेप्रमाणे, आवडीप्रमाणे खरेदी करण्यासाठी वस्तू सुचवता येतात. यामुळे लोकांना ऑनलाईन खरेदी करायला आवडते. नेटफ्लिक्सवर आपण एखादा विनोदी सिनेमा बघितला तर आपल्याला नंतर अनेक विनोदी सिनेमे सुचवण्यात येतात तसंच हे.

ऑनलाईन शॉपिंगसाठी वेबसाईटवर गेल्यावर बऱ्याचदा आपल्याला मदत करायला तत्पर असणारा चॅटबॉटही दिसतो. हा चॅटबॉट AI तंत्रज्ञान वापरून बनवलेला असतो. आपण इंग्रजी भाषेत लिहिलेले प्रश्न त्याला समजतात. (भविष्यात चॅटबॉटला इतरही भाषा समजू शकतील.) आपली सगळी शॉपिंग हिस्ट्री त्याला माहीत असते. त्यामुळे आपल्या प्रश्नांना तो जास्त चांगल्या प्रकारे उत्तरं देऊ शकतो. शिवाय चॅटबॉट चोवीस तास आपल्या सेवेसाठी हजर असतो. आपण मध्यरात्री ऑनलाईन शॉपिंग करत असलो तरी चॅटबॉटच्या सेवेत खंड पडत नाही !

अनेक दुकानांमध्ये, सुपर स्टोअर्समध्येही बऱ्याच कारणांनी AI तंत्रज्ञान वापरलं जातं. सुपरस्टोअर्समध्ये असणारा एक प्रश्न म्हणजे तिथून चोरून वस्तू उचलणारे चोर. बऱ्याचदा काही चोर तर प्राईस टॅगची अदलाबदल करून कमी किंमतीत वस्तू खरेदी करण्याची करामत करतात! वरवर दिसायला ही छोटीशी गोष्ट वाटत असली तरी अशा चोरांमुळे प्रचंड नुकसान होते. एकट्या अमेरिकेमध्येच दरवर्षी अशा चोरांमुळे होणारे एकूण नुकसान १०० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे! AI मुळे या चोरांना आळा बसण्याच्या मार्गावर आहे. AI तंत्रज्ञानाचा आधार असणारे CCTV चोरांच्या कृती ओळखतात आणि अलार्म वाजवतात !

सुपरस्टोअरमध्ये खरेदी झाल्यानंतर ग्राहकांना नकोसा वाटणारा एक अनुभव म्हणजे पेमेंट करण्यासाठी रांगेत उभं राहणं, आणि काऊंटरवर गेल्यावर काऊंटरवरच्या व्यक्तीनं प्रत्येक वस्तूवरचा बार कोड स्कॅन करणं. हा प्रकार बऱ्यापैकी वेळखाऊ असतो. 'ॲमेझॉन गो'मध्ये (ॲमेझॉन कंपनीचे प्रत्यक्षातले स्टोअर्स) गेल्यानंतर ग्राहक आपल्याला हव्या त्या वस्तू उचलतात. अर्थातच हा अनुभव इतर कुठल्याही सुपरस्टोअरसारखाच असतो. पण 'ॲमेझॉन गो'मध्ये ग्राहकांना पेमेंट करण्यासाठी रांगेत उभं राहावं लागत नाही. शॉपमध्ये प्रवेश करतानाच ग्राहकाच्या स्मार्टफोनमध्ये स्कॅनिंग करत त्याच्या अकाऊंटची नोंद केली जाते. मग शॉपिंग




चालू असताना AI तंत्रज्ञानावर आधारित असणारे कॅमेरे 'कॉम्प्युटर व्हिजन' वापरत ग्राहकानं कोणत्या वस्तू घेतल्या आहेत ते बरोबर ओळखतात. एकदा हव्या असणाऱ्या वस्तू घेतल्या की ग्राहक सरळ शॉपच्या बाहेर जातो. ग्राहकाच्या अकाऊंटमधून बिलाची रक्कम आपोआप भागवली जाते! उद्याच्या जगात असे शॉप्स जिकडेतिकडे दिसले तर आपल्याला आश्चर्य वाटायला नको !

AI च्या साहाय्यानं कोणत्या वस्तूचा किती साठा करून ठेवायला हवा, येणाऱ्या काळात कोणत्या वस्तूची किती विक्री होईल यासारखे अंदाजही अधिकाधिक अचूक होत चालले आहेत. AI मुळे रिटेल क्षेत्रात होणारी क्रांती शॉपिंगचा अनुभव बदलून टाकेल यात शंकाच नाही ! **(क्रमशः)**

**संदर्भ :**

१. *https://global.hitachi-solutions.com/blog/ai-in-retail/*
२. *https://www.algolia.com/blog/ai/how-ai-can-benefit-the-retail-industry/*
३. *Artificial Intelligence – Achyut Godbole*

**संपर्क : achyutgodbole@gmail.com**

बालभारती

# अभिजात मराठी

मराठी भाषा विभाग
भाषा जनाची | भाषा मनाची

**नुकताच मराठी भाषेला 'अभिजात' भाषेचा दर्जा प्राप्त झाला आणि सगळ्या मराठी भाषिकांची मान अभिमानाने उंचावली. हजारो वर्षांची परंपरा लाभलेली आपली मराठी ही जगातील एक महत्त्वाची भाषा आहे. मराठी भाषेच्या या वारशांचा सन्मान करणे आणि पुढील पिढ्यांकडे तो अधिक समृद्ध रूपात सुपूर्द करणे हे आपले कर्तव्य आहे. मराठी अभिजात भाषा झाली आता तिची वाटचाल ज्ञानभाषेकडे होणे आवश्यक आहे. या प्रयत्नात खारीचा वाटा म्हणून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी 'बालभारती' आणि महाराष्ट्र शासनाचा 'मराठी भाषा विभाग' मिळून 'अभिजात मराठी' हा उपक्रम राबवत आहोत. या विविध सदरांच्या माध्यमातून दरमहा सहा पाने मराठी भाषेच्या गौरवासाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. आपण सारे मिळून मराठी भाषेचे जतन व संवर्धन करूया.**

**प्रवीण दवणे**

# शब्द गुहेतील अलीबाबा

मृग नक्षत्र बरोबर घेऊन येते ते पावसाचे ओले वारे! या वाऱ्यातून नवी बीजे अंकुरण्याची स्वप्नं पडतात. आज आपण पावसाची सोबत घेऊन येणाऱ्या वातावरणातील काही अगदी जवळचे, परंतु बरेच दिवस न पाहिल्याने दूरचे असलेले आपल्या भाषेतील काही शब्द पाहूया.

पहिल्या पावसानंतर मातीचा सुगंध येतो या सुगंधाला कधी आपण मृत्तिका गंध म्हणतो, तर कधी मृद्‌गंध! म्हणजे केवळ 'माती' साठी आपल्याकडे किती शब्द जमा झाले ते जरा मजेने पहा. माती, जमीन, धरणी, भूमी, तर कधी भुई, ओघाने पृथ्वीसाठी काही शब्द आठवतील. वसुंधरा, अवनी!

पावसाळी वातावरण होऊ लागलंय तर जरा आभाळाकडे पाहूया. कधी स्वच्छ, निरभ्र, नितळ आकाश!

तर, सावळ्या मेघांनी भरून येते ते आभाळ! कधी देवालयाचा गाभारा भासते ते गगन, निळाई भरून उरते ते नभ! आकाशासाठी एक अक्षरी शब्द आहे? माहीत आहे? 'ख'!

होय ख! म्हणून 'ख'मध्ये विहार करतात ते खग! म्हणजेच पक्षी! पाख म्हणजे पंख, म्हणून पंखांने उडते ते पाखरू!

एका शब्दाच्या पोटात कसा दुसरा शब्द लपलेला असतो. हळूच डोकावतो. कांगारू आईच्या पोटाच्या पिशवीत कांगारूचे पिल्लू असते तसेच शब्दाच्या पोटात नवे शब्द असतात आणि तेच बघणं हीच एक मौज असते.

आता खग, पक्षी, पाखरू, प्रमाणे विहग! नि एखादे दृश्य आपण उंच डोंगरावरून पाहत असू, किंवा विमानातून खाली पाहिलं तर आपण म्हणतो, काय विहंगम दृश्य आहे! मिळाला ना नवा शब्द!

आता माती, आकाश, पंख पाखरू असा मस्त प्रवास करीत आहोत तर पाखरू पिलासाठी विणते ते काय? घरटे! सुगरणीचे घरटे होते खोपा! निसर्ग कन्या बहिणाबाई चौधरी यांची कविता मिळवून वाचा. 'खोप्यामध्ये खोपा सुगरणीचा चांगला!' किती सुरेख शब्द घरट्यासाठी, 'खोपा' परंतु आणखी एक क्वचित वापरला जाणारा शब्द टिपून ठेवा. तो म्हणजे कोटर म्हणजे घरटे! पूर्वीच्या कवितांमध्ये हा शब्द अनेकदा आला आहे. कोटरामध्ये

पक्षी गोळा झाले इत्यादी!, तसेच पक्ष्यांचा थवा, आपल्या ओळखीचा; पण आणखी एक गोड शब्द आहे, 'भिरी' कविवर्य बोरकरांची कवितेतील एक ओळ आहे, 'परतली घरा भिरी!' पक्षी चाऱ्यासाठी दूरवर जातात, पण संध्याकाळी कोटरात परत येतात. मग आता संध्याकाळ ह्या वेळेच्या विविध छटांचे, शब्दही वेगळे; नि वेळ एकच, पण संदर्भ बदलले की संध्याकाळच कशी निराळी होते, त्यासाठी शब्द कसे वेगळे असतात हे पाहणे आनंदाचे, म्हणजेच मौजेचे ठरेल. पहा एकच वेळ, संध्याकाळ पण व्यक्तीचे वय अधिक ज्येष्ठ झाली की आपोआपच आपण त्या आयुष्याला 'सायंकाळ' म्हणतो, वयाची सायंकाळ! कुणाची तरी वाट पाहतो ती 'सांज' आणि ज्या संध्याकाळी आपण एखाद्याच्या काळजीने व्याकूळ होते, तेव्हा तीच संध्याकाळ कातरवेळ होते. आहे की नाही भाषेची गंमत!

आपली मराठी भाषा किती समृद्ध आहे, संपन्न आहे, वैभवशाली आहे त्याचा प्रत्यय शब्द वेचत गेल्याने येत जातो. आता हेच पहा ना.., समृद्ध, संपन्न, श्रीमंत, वैभवशाली, एकाच आशयासाठी किती शब्द! पण ते कुठेही कसे वापरायचे नाहीत. बोटातील अंगठी, कानात घालून नाही चालणार तसंच! दागिन्याप्रमाणे शब्दही योग्य प्रसंगी, योग्य ठिकाणी उपयोजावे लागतात. ही समृद्धी, हा खजिना विविध प्रकारच्या वाचनातून आपल्याला मिळतो. अनेक व्यक्तींची व्याख्याने ऐकली की आपोआपच श्रवणातूनही नवे नवे शब्द आपल्याला मातृभाषेचे वैभव दाखवतात. या किशोरवयात जे विद्यार्थी नवे नवे काही वेचायला उत्सुक आहेत, आणि शाळेच्या पुस्तकांच्या पलीकडे जाऊन नवे शब्दधन टिपायला आतुर आहेत, त्यांना अक्षरशः जिथे पाहावे, तिथे आपल्या श्रीमंत मराठी भाषेचा अनुभव येईल. नव्या नव्या शब्दांचा आनंद घेणे ही एक मजेशीर क्रीडा आहे तो खरंच एक खेळ आहे म्हणूनच या शब्दसाधनेकडे जर तुम्ही मजेने पाहिलेत, आणि आपले शिक्षक, आपले पालक आपल्या मित्र-मैत्रिणी यांच्याबरोबर एकाच गोष्टीसाठी कितीतरी शब्द आहेत त्याच्या शोधाचा जर खेळ खेळला तर काही दिवसांनी आपोआपच कथा, कविता वाचण्याची वेगळीच गोडी तुम्हांला वाटू लागेल. निबंध लिहिताना शब्दासाठी थांबावे लागणार नाही, कुठेही बोलताना योग्य शब्द आठवत खोळंबावे लागणार नाही. नव्या शब्द गुहेचे तुम्ही भाग्यवान अलीबाबा व्हाल! ही गुहा उघडण्यासाठी मंत्र. एकच! कुठला? वेचू आनंदे!

**संपर्क :** ९८२०३८९४१४



डॉ. नीलिमा गुंडी

‘‘आई, मावशीच्या पायाला फ्रॅक्चर झालं आहे ना? चल ना जाऊ तिला भेटायला!’’ किमया लाडिकपणे म्हणाली.

‘‘हो, जाऊ या. पण आधी अभ्यास पूर्ण कर. थांब मी तुला आज अक्षरांचे पाय कधी मोडायचे तेच शिकवते. तुम्ही मुलं शब्द लिहिताना नको त्या अक्षरांचे पाय ‘फ्रॅक्चर’ करता आणि जिथे पाय मोडायला हवे, तिथे ते चिन्ह देतच नाहीत. एकूण काय, शब्द आधी नीट ‘चालला’, तरच अर्थापर्यंत पोहोचेल ना? सगळाच गोंधळ होतो मग! आता लिही नीट!

१) उच्छ्वास २) सदसद्विवेकबुद्धी ३) विद्वान

किमयाने लिहिले होते, ते असे –

१) उच्चवास २) सद्सद् विवेकबुद्धी ३) विद्वान्

ते पाहून आई वैतागली नि म्हणाली, ‘‘अगं, जरा

# पाय मोडलेली अक्षरे



माझ्या उच्चारांकडे लक्ष ठेव की! मी ‘उच्छवास’ म्हणाले. आपण ‘श्वासोच्छवास’ शब्द नाही का वापरत! आपण श्वास आत घेतो आणि उच्छवास बाहेर टाकतो. लिही शब्द दहादा!

आणि हे काय? सदसद्‌विवेकबुद्‌धी हा शब्द तुला माहीतच नाही ना? मी तुला सांगते त्याचा अर्थ. सत् म्हणजे चांगले. असत् म्हणजे वाईट. हे दोन शब्द एकत्र होताना पहिल्या शब्दातील– सत् मधील – ‘त्’ च ‘असत्’ शी संधी झाला. ‘त’ हे अक्षर ‘अ’ स्वर मिसळल्यावर ‘द’ असे पूर्ण झाले. तेव्हा तेथे पाय मोडायचं कारण नाही.’’

‘‘आई, त्याला वॉकर मिळाला का? तो ताठ चालायला लागला का?’’ किमयाचे प्रश्न चालूच होते.

आई म्हणाली, ‘‘तू तुला हवं त्या पद्‌धतीनं समजून घे. पण त्यात पहिल्या ‘द’ चा पाय मोडायचा नाही! एवढं निश्चित. चांगलं काय नि वाईट काय, यांच्यात निवड करणे. विवेक बाळगणे असा त्या शब्दाचा अर्थ आहे. तू जर ‘सद् सद्’ म्हणशील तर निवड कशात करायची; अशा प्रश्न पडेल ! आणि हो, ‘विद्‌वान’ शब्द इतकंच काय अकस्मात, क्वचित असे शब्द, आणि इंग्रजी पदव्या उदाहरणार्थ एस.एस.सी. हे शब्दही पाय न मोडता लिहायचे असतात. अगं, लेखनविषयक नियमांचं पुस्तक वाचत जा. नियम तोंडपाठ पाहिजेत!’’

मग आई पुढे म्हणाली, ‘‘तू ज्यांना पाय मोडकी अक्षरं म्हणते ना, त्यांना नेमकं बोलायचं तर ‘व्यंजने’ म्हणतात. त्या व्यंजनामध्ये स्वर मिळाला की पूर्ण अक्षर बनतं. एरवी आपण अक्षर हा शब्द जरा सैल अर्थाने वापरतो. पण हा नियम लक्षात ठेव. आता हे शब्द बघ... दिग्विजयी राजा. यात ‘दिग्विजय’ हा जो शब्द आहे, त्याची फोड अशी आहे– दिक् + विजय. दिग्विजयी म्हणजे (सर्व) दिशांमध्ये विजय मिळवणारा (राजा), अशी फोड करणं म्हणजे संधी सोडवणं. कळलं का?’’

आता किमयाही खुलली आणि आईला म्हणाली. ‘‘अगं आई, म्हणजे विज्ञानाच्या प्रयोगात जसं एखादा पदार्थ दुसऱ्यात घातला की त्याचं रूप बदलतं तसंच भाषेतपण होतं की!’’




आई म्हणाली, ‘‘अगं, विज्ञानाचा प्रयोग कशाला! साधं घरातलं उदाहरण घे! मी पेलाभर पाण्यात लिंबाचा रस, मीठ, साखर घातल्यावर होतं की नाही ‘सरबत’ नावाचं नवीन पेय तयार! तसंच आहे हे ! भाषेतही दोन–तीन शब्द एकत्र आले. की असा रूपबदलाचा खेळ सुरू होतो. आता हे शब्द बघ. जगन्नाथ या शब्दात जगत्+नाथ असे दोन शब्द आहेत. पाणी तेच पण त्यात लिंबाचा रस टाकला की लिंबू पाणी आणि कोकमाचा गर टाकला की कोकम सरबत असा दुसरा पदार्थ होतो. तसं जगन्नाथ आणि जगदीश या शब्दांचं झालं बघ! दोन्ही शब्दांत ‘जगत्’ हा एकच शब्द आहे. पण पुढचा शब्द बदलला की रूप बदललं! हे कधी, कसं, का होतं. हे कळायला खूप वाचायला हवं. मी तुला रोज दहा ओळी लिहायला सांगेन. ऐकून लिहायच्या... श्रुतलेखन म्हणतात त्याला! तुझे कान तयार झाले की, तुला आपोआप भाषेतल्या गमती कळायला लागतील. स्वतःच वाचन, लेखनही हवंच हं भरपूर ! कबूल?’’ यावर आईने पुढे केलेल्या हातावर टाळी देत किमया म्हणाली, ‘‘कबूल! मी तुझ्या आज्ञेचा ‘सन्मान’ करीन. आई. सन्+मान – बरोबर ना?’’

यावर दोघीही हसू लागल्या आणि मावशीकडे जाण्यासाठी किमयाची तयारी सुरू झाली.

**(क्रमशः)**

**संपर्क ०२०–२४४८६०१५**

# गंमत शब्दांची

प्रा. विश्वास वसेकर
संपर्क – ९९२२५२२६६८



## वंगण

बैलगाडी चालत असताना म्हणजेच बैलगाडीचा चाक आकाभोवती फिरताना करकर वाजू नये, आकाची व माणीची झीज होऊ नये, गाडी चालण्यास सोपे जावे यासाठी गाडीच्या आकास/चाकास लावायचा पदार्थ किंवा तेल. हे वंगण मोटेच्या चाकास, कण्यासही लावले जाते. त्यामुळे मोट ओढण्यास सोपी जाते. सध्या अनेक आधुनिक शेती साधनासाठी वंगण उपयोगाचे आहे. यास 'रोगण' असेही म्हणतात.



## आंदण

ग्रामीण माणसांच्या व्यवहारात काल-परवापर्यंत हा शब्द चांगलाच रूढ होता. आजकालच्या पिढीत हा शब्द मंद गतीने लोप पावत चालला आहे. 'अंदण/आंदण' याचा ग्रामीण माणूस जो अर्थ घेतो तो 'बक्षीस' असा आहे. किंबहुना 'कसलीही अपेक्षा न धरता केलेले मोठे दान.' कुणाला दहावीस रुपये बक्षीस वा दान म्हणून दिले तर त्या वेळी 'आंदण' शब्द वापरला जात नाही. पण सारी इस्टेटच जाहीर करायची असेल, तीही कसली अपेक्षा न बाळगता, तेव्हा 'आंदण' शब्द वापरतात. संस्कृतातील 'अन्यदान व अनुदान' यापासून हा शब्द आलेला असावा.



## कडदोरा

शंभर वर्षांपूर्वी आपल्याकडील प्रत्येक पुरुषाला आपल्या कमरेला चांदीचा, रेशमाचा किंवा साधा दोरा बांधावा लागे. अनेकदा काळ्या रंगाचा रेशीम गोफ कमरेभोवती बांधला जात असे. या कमरेभोवती बांधलेल्या दोऱ्यालाच 'कडदोरा' असे म्हणत. कडदोऱ्याप्रमाणेच याला 'कडदोरा, करगोटा, करदोडा' असेही संबोधले जाते. हा 'कडदोरा' धार्मिक आणि सांस्कृतिक अर्थ प्रकट करणारे प्रतीक म्हणून वापरला होता. ती केवळ एक शोभेची वस्तू नव्हती. 'कटि' या संस्कृत शब्दाला 'दोरा' हा प्राकृत देशी शब्द लागून 'कटिदोरा' शब्द तयार झाला व त्याचा पुढे 'कडदोरा' बनला. हा दोरा कमरेवरच बांधला जात असल्याने हा अर्थ ठीक वाटतो.



## उंबर पिकले आणि अस्वलाचे डोळे आले

अस्वल या प्राण्याला पिकलेले उंबर फार आवडते. अस्वलासाठी उंबर पिकणे म्हणजे त्याने ज्या क्षणाची वाट पाहिली होती तो क्षण येणे. अस्वलाच्या दुर्दैवाने जर त्याच वेळी त्याचे डोळे आले तर त्याला पिकले उंबर दिसणारच नाहीत. ऐनवेळी निर्माण झालेल्या अडचणीमुळे एखाद्या गोष्टीचा फायदा आपल्या पदरात पाडून न घेता येणे अशा अवस्थेला म्हणतात, 'उंबर पिकले आणि अस्वलाचे डोळे आले.'

# प्रश्नमंजुषा

उदय कदम

१. खालीलपैकी कोणत्या भाषेला सर्वप्रथम अभिजात भाषेचा दर्जा मिळाला?

१.तमिळ २. संस्कृत
३. तेलुगू ४. उडिया

२. 'मराठी राजभाषा गौरव दिवस' दरवर्षी कोणत्या दिवशी साजरा केला जातो?

१. २७ सप्टेंबर २. २७ मार्च
३. २७ फेब्रुवारी ४. १ में

३. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याकरिता केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याकरिता कोणती समिती स्थापन करण्यात आली आहे?

१. लक्ष्मीकांत देशमुख समिती
२. ज्ञानेश्वर मुळे समिती
३. विश्वास पाटील समिती
४. यापैकी नाही

४. श्रवणबेळगोळ येथील मराठी शिलालेखाची निर्मिती कोणत्या वर्षी झाली आहे?

१) इसवी सन १०१०-११
२) इसवी सन ११११-१२
३) इसवी सन १११६-१७
४) इसवी सन १११४-१५

५. पहिले मराठी साहित्य संमेलन कुठे भरले होते?

१. मुंबई २. पुणे
३. नाशिक ४. बडोदा

६. २०२४ चा साहित्य अकादमी बालसाहित्य पुरस्कार खालीलपैकी कोणत्या लेखकाला मिळाला आहे ?

१. भारत सासणे २. सदानंद मोरे
३. इंद्रजित भालेराव ४. नारायण पुरी

७. 'चंदगडी' ही भाषा कोणत्या जिल्ह्यात बोलली जाते?

१. सिंधुदुर्ग २. गोंदिया
३. कोल्हापूर ४. लातूर

८. खालीलपैकी सूचक शब्द ओळखा.

१. अनुसूया २. अनुसया
३. अनसूया ४. अनसया

९. 'माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा' असे मराठीबद्दल कोणी उद्गार काढले आहेत?

१. मोरोपंत २. सुरेश भट
३. कुसुमाग्रज ४. विठ्ठल वाघ

१०. मराठीला अभिजात भाषेच्या दर्जासाठी महाराष्ट्राकडून कोणत्या वर्षी प्रस्ताव दिला गेला?

१. २०१२ २. २०१३
३. २०१४ ४. २०१५

संपर्क : ९७६७३१३८४३

**प्रश्नमंजुषा मे २०२५ ची उत्तरे**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ - ४ | २ -२ | ३-३ | ४-२ | ५-२ |
| ६-१ | ७-३ | ८-२ | ९-३ | १०-३ |

# दोन मित्र हजारो वृक्ष

मालविका देखणे

हिरवाईचे उपयोग शेकडो आहेत. कदाचित हजारो असतील. हिरवाई म्हणजे वनस्पती, गवत, झाडे, वृक्ष अशी सगळी मंडळी. घरासमोर झाडे असली की आपण सुखावतो. बागेत एक फेरफटका मारला तरी मन प्रसन्न होते. आजही आपली कितीतरी औषधे झाडांपासूनच तयार होतात. झाडाचा आणखी एक महत्त्वाचा उपयोग म्हणजे मानसोपचार! वनस्पती आपल्याला नैराश्यातून बाहेर काढतात, जगण्याची उभारी देतात बरं! जपानमध्ये तर Shinrin-yoku अर्थात Forest-bathing असा उत्सवच असतो. याला वन-स्नान किंवा वनविहार असेही म्हणतात. अशी बरीच मंडळी आहेत ज्यांना वनस्पतींनी दु:खातून बाहेर काढले आहे; अक्षरशः जगवले आहे. ही कहाणी त्याबद्दलच आहे. ही कहाणी दोन मित्रांची आहे ज्यांनी ओसाड माळरानावर जंगल निर्माण केले. गावाचे पर्यावरण पुन्हा जिवंत केले. ही कहाणी आहे Jia Haixia (जा हिया (तो स्वतः असाच उच्चार करतो.) किंवा हयश्या) आणि Jia Wenqi (जा वेन्ची) या चिनी जोडगोळीची.

*'एकमेकां सहाय्य करू, दोघे धरू सुपंथ*
*गाव करू सुंदर, पर्यावरण करू जिवंत,'* याचे मूर्तिमंत आणि प्रेरक उदाहरण. स्वतः काम करताना, स्वतःचा उपचार आणि विकास करताना एक बहुआयामी विकास कसा साधता येतो त्याचे उत्तम उदाहरण हे मित्र आहेत.



कदाचित तुम्ही त्यांची ही कहाणी पूर्वी वाचली असेल. हरकत नाही, पुन्हा वाचा आणि आपल्या मित्र-मैत्रिणींना वाचायला द्या किंवा वाचून दाखवा. आज आपल्याला अशा सृष्टीवीरांची नितांत गरज आहे.

जा हिया आणि जा वेन्ची यांच्या २०-२१ वर्षांच्या अथक मेहनतीमुळे 'ये' नदीच्या काठावरची आणि आसपासची ओसाड झालेली जमीन पुन्हा जिवंत झाली आहे. पुन्हा एकदा हिरवाईने नटली आहे. जेथे २-४ तुरळक झाडे होती आता तेथे हजारो तजेलदार वृक्ष डोलत आहेत. हे अद्‌भुत आहे. ह्याहून आश्चर्याची गोष्ट म्हणजे हिया आणि वेन्ची दोघे अपंग आहेत. पण त्याचे रडगाणे गात न बसता, बाऊ न करता त्यांनी ही अशक्यप्राय गोष्ट शक्य करून दाखवली आहे आहे. उत्तर चीनमधील हुवे प्रांतातील लहानसे 'येली' गाव या दोघांमुळे जगाला माहीत झाले. BBC, Tree Nation, Chinese Voices, DOER सारख्या व इतर मोठ्या संस्थांनी त्यांची मुलाखत घेतली, त्यांच्या कामावर लघुपट बनवले. हे सारे इंटरनेटवर उपलब्ध आहेत. हिया आणि वेन्ची दोघे बालपणापासूनचे मित्र. त्यांचे वडीलही मित्र होते. दोघे एकाच शाळेत जात. हियाचा जन्म १९६२ सालचा. जन्मतःच त्याच्या डाव्या डोळ्यात मोतीबिंदू होता त्यामुळे त्या डोळ्याने त्याला कधीच दिसले नाही. शालेय शिक्षणानंतर तो परिसरातील खाणीत कामाला लागला. लग्न झाले. एक मुलगा झाला. पत्नी सतत आजारी असायची. हिया सर्व निभावून नेत होता. पण २०००साली त्याचे जग अक्षरशः अंधारात बुडून गेले. खाणीतल्या स्फोटात एक कपची त्याच्या उजव्या डोळ्यात घुसली आणि ऐन उमेदीच्या काळात तो आंधळा झाला. पत्नी आजारी, मुलगा केवळ ४ वर्षांचा आणि आंधळेपण आलेले. हियाला नैराश्याने ग्रासले. हिया म्हणतो, "मी डिप्रेशनमध्ये गेलो. मनात वाईट विचार येत होते. या वेळी माझ्या मदतीला माझा मित्र वेन्ची आला. झाडे लावण्याची कल्पना त्याचीच."

१९६३ साली जन्मलेला वेन्ची हियाहून एक वर्ष लहान आहे. त्याची गोष्ट आणखी वेगळी आहे. तो डबल ॲम्प्युटी आहे. अपघातामुळे त्याला खांद्यापासून हात नाहीत. वेन्ची जन्मतः अगदी सर्वसामान्य मुलांसारखाच होता. तो तीन वर्षांचा असतानाची गोष्ट. खेळता खेळता त्याने जमिनीवर पडलेल्या एका विजेच्या वायरला हात लावला. त्यात वीजेचा प्रवाह प्रवाहित असल्याने त्याला जबरदस्त विजेचा झटका (Electric Shock) बसला. वेन्ची वाचला पण जीव वाचवण्यासाठी त्याचे दोन्ही हात कापून टाकावे लागले. वेन्ची म्हणतो, "मी इतक्या लहानपणी हात गमावले की हात असल्याची आठवणही मला उरली नाही. काही दिवसांत मी हाताशिवाय माझे सर्व व्यवहार करू लागलो. मित्रांसोबत खेळू लागलो, पोहू लागलो. लिहिणे, शिवणे, अशी सर्व कामे पायांनी करू लागलो. माझे अडले नाही." गावातील सरकारी कर्मचाऱ्यांनी त्याला अपंग म्हणून सर्वतोपरी मदत केली. ७ वर्षांचा झाल्यावर त्याला शाळेत पाठवले. १९७६मध्ये त्याचे शालेय शिक्षण संपल्यावर त्याला फळबागेत काम दिले. हे काम त्याला छान जमले. वेन्ची लोकांना मदत करताना कधीही मागेपुढे पाहत नाही. दोन वेळा त्याने नदीत पडून बुडणाऱ्या मुलांना वाचवले. नंतर तो अपंग मंडळींच्या ट्रूपसोबत फिरून पायांनी लिहिण्याच्या कलेचे प्रदर्शन करून पोटापुरते कमवू लागला. पण सन २००१मध्ये त्याचे वडील आजारी पडले. वडलांची काळजी घेण्यासाठी तो गावी परत आला. हिया आणि वेन्चीची जोडी पुन्हा जमली ती याच वेळी. दोघे बालमित्र परिस्थितीमुळे गांजले होते. उत्पन्नाचे साधन नव्हते; कोणापुढे हात पसरणे त्यांना रुचत नव्हते. कोणावर भार होणेही पटत नव्हते. गावाचीही परिस्थिती वाईट होती. हसता-खेळता सुंदर हिरवा गाव खाणीमुळे पार बरबाद झाला होता. नदी प्रदूषित झाली होती. त्यामुळे तिच्यातील मासे आणि कोळंबी मरून गेले होते. खाणीसाठी बेसुमार वृक्षकटाई झाली होती. हिरवाई नष्ट झाली होती. झाडेच नसल्याने पक्षीही उडून गेले होते. सर्व भकास झाले होते. यासाठी काही करायला हवे होते. पण काय? सर्वत्र निराशा दाटून आली होती. हिया खूपच विषण्ण झाला होता. मनात वाईट विचार येत होते. ह्या दोन्ही प्रश्नांवर वेन्चीने एक उपाय शोधला होता. त्याला एक काम नीटपणे येत होते- झाडे लावण्याचे. तेच करावे असे त्याने ठरवले. " आपण झाडे लावू या." तो म्हणाला. हे ऐकून हिया तीन ताड उडालाच! "बाबा रे, गंमत करू नकोस. मी आंधळा आणि तू थोटा. मला दृष्टी नाही, तुला हात नाहीत. झाडे लावणे कसे जमायचे?"

वेन्चीने झाडे लावण्याचे प्रशिक्षण घेतले होते. त्याला अनुभव होता. तो म्हणाला, "हे बघ. जगण्यासाठी काही

उद्देश हवा. आपण झाडे लावू. काळजी करू नकोस. मी तुला शिकवेन."

ठरले, झाडे लावायचे ठरले! पण लावायची कोठे? हा प्रश्न होताच. येथेही गावातील अधिकारी मदतीला आले. गावातील खाणींसाठी टेकू म्हणून झाडांच्या बुंध्यांची गरज होतीच. 'या दोघांनी झाडे लावावीत, ती मोठी झाली की विकून पैसे कमवावे,' यासाठी गावातील अधिकाऱ्यांनी नदीच्या पलीकडील तीन एकर जमीन देऊ केली. झाडांची मालकी दोघांची राहणार होती. या कामाचा मोबदला म्हणून त्यांना दरमहा थोडे पैसेही मिळणार होते. जमीन खडकाळ आणि ओसाड होती. बियाणांसाठी पैसे नव्हते. मदतीला कोणी नव्हते. वेन्चीने धीर दिला आणि म्हणाला, " गड्या, तू माझे हात हो आणि मी तुझे डोळे होईन." (You be my arms and I will be your eyes.) आणि मोहीम सुरू झाली! आयुष्याला नवे वळण मिळाले. २००२ मध्ये सुरू केलेला हा उपक्रम आजतागायत सुरू आहे.

१४-१५ वर्षे त्यांचा दिनक्रम ठरलेला होता. सकाळ झाली की वेन्ची हियाला बोलवायला येतो. हियाला उजेड-अंधाराची वेगळी जाणीव नाही. त्यामुळे वेन्ची आला की सकाळ झाली हे त्याच्या लक्षात येते. मग तयार होऊन दोघे कामावर निघतात. हियाच्या खांद्यावर पाणी काढण्यासाठी हूक लावलेला बांबू आणि बादली असते. हियाकडे चिझल अथवा लांब टोकदार सळई, विळा, हातोडी अशी अवजारे असतात. दोघांजवळ जेवणाचा डबा असतो. डोळस वेन्ची रस्ता दाखवतो. हिया त्याच्या शर्टाची रिकामी बाही धरून चालतो. नदी आली की हिया वेन्चीच्या पाठुंगळी बसतो. तो त्याला नदीपार नेतो. मग काम सुरू होते. कलम बनवण्यासाठी दोघे झाडाच्या फांद्या वापरतात. वेन्चीच्या मार्गदर्शनात हिया झाडावर चढतो आणि कलम रोवायला योग्य अशा फांद्या विळ्याने



कापतो आणि खाली टाकतो. वेन्ची पायांनी फांद्या एकत्र करतो. फांदी रोवण्याचे काम असते हियाचे. त्यासाठी तो जमिनीत पटाशी/छिन्नी ठोकून खड्डा खणतो. त्यात ती फांदी रोवतो आणि माती दाबतो. कलमे रोवून झाली की पाणी घालण्याचे काम असते वेन्चीचे. हूक लावलेली काठी आपल्या खांदा आणि मान यांमध्ये धरून तो नदी किंवा कालव्याजवळ जातो. हुकला डबा अडकवलेला असतो. त्यात पाणी घेऊन तो नव्याने लावलेल्या प्रत्येक कलमाला आणि पूर्वी लावलेल्या कलमांनाही घालतो. दुपारी दोघे डबा खातात. जेवण म्हणजे गोड बनपाव असतो. नंतर पुन्हा काम सुरू होते. संध्याकाळी दोघे घरी जातात. हाच क्रम पहिल्या दिवसापासून सुरू होता, आणि आजही सुरू आहे.

काही दिवसांनी फांदी रुजते. वाढू लागते. या हजारो फांद्यांचे आता वृक्ष झाले आहेत. ते आनंदात डोलत आहेत. नदीच्या काठी जिथे वैराण जमीन होती तेथे हिरवाई फुलली आहे. जंगल उभे राहिले आहे. पण हे इतके सोपे नसते. याचा अनुभव त्यांना पहिल्याच वर्षी आला. त्यांना काम करताना बघून गावकरी खिल्ली उडवत. काही जण कलम देण्यास नकार देत. पण 'कुणी निंदा कुणी वंदा, आमचा वृक्षारोपणाचा धंदा' या ब्रीदाने दोघे काम करत राहिले. पहिल्या वर्षी त्यांनी सुमारे ८०० फांद्या रोवल्या होत्या. त्यातील २-४ सोडल्या तर सगळ्या मेल्या! तीव्र उन्हाळा आणि पाण्याचा अभाव हे कारण होते. हिया पुन्हा निराश झाला. "आपण हे काम बंद करू," असे म्हणाला. पण वेन्ची ठाम होता. त्याने हियाला धीर दिला आणि दोघे पुन्हा कामाला लागले. कामाच्या पद्धतीत थोडा बदल, थोडी सुधारणा केली. पूर्वी ते खड्डा खणून कलम लावत. ते जिकरीचे होते. आता सळाखीने ठोकून खड्डा करत आणि त्यात फांदी रोवून माती घट्ट करत. पाणी आणणे जिकरीचे होते म्हणून त्यांनी नदीपासून चक्क कालवा खणून काढला. आता पाणी देणे जरा सोयीचे झाले. दुसऱ्या वर्षी बरीच कलमे जगली. असे करता करता १०-१२ वर्षांत शेकडो नव्हे तर काही हजार झाडे उभी राहिली.

गावकऱ्यांना त्यांचे कौतुक वाटले. ते त्यांना थोडी मदत करू लागले. कोणी अवजारे नीट करून देत असे तर कोणी कलमे आणून देत असे. नदीच्या काठावर उंच झाडे डोलू लागली. त्याचा फायदा दिसला. झाडे आल्यावर पक्षी आले, घरटी तयार झाली. झाडांमुळे धूळ कमी झाली. प्रदूषण कमी झाले. जमिनीची प्रत थोडी बरी झाली. "आमचा मूळ उद्देश होता पैसे मिळवण्याचा. पण त्यांचे पर्यावरणीय फायदे लवकरच लक्षात आले आणि आम्हांला आनंद झाला. सध्या आमचा झाडे तोडून विकण्याचा बेत नाही," असे वेंची म्हणतो. २०१४-१५ मध्ये कोण्या उत्साही व्यक्तीने हिया आणि वेन्चीचा व्हिडीओ करून यू ट्यूब वर पोस्ट केला. त्यानंतर मीडियाचे लक्ष त्यांच्या कामाकडे गेले. बातम्या छापून आल्या. साऱ्या जगाचे लक्ष या अनोख्या मित्रांकडे गेले. मोठमोठी वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या यांनी त्यांची दखल घेतली, मुलाखती घेतल्या, फोटो काढले, व्हिडिओ तयार केले. दोघांना थोडीफार प्रसिद्धीही मिळाली. मग हा रेटा इतका वाढला की त्याचा त्यांना वैताग होऊ लागला. काही महिन्यांनी हे कमी झाले. काम पुन्हा सुरू झाले. गावातील अधिकाऱ्यांनी त्यांना आणखी जमीन दिली. नंतर झाडे लावण्यासाठी ओसाड झालेला डोंगरही दिला. काम सुरू झाले. अधूनमधून गावकरी, महाविद्यालयाचे विद्यार्थी त्यांना मदत करू लागले, उत्साही मंडळी श्रमदान करू लागली. नंतर त्यांना बाहेरून मार्गदर्शनासाठी बोलावणी येऊ लागली. वेंची दौऱ्यावर जाऊ लागला. हिया पोप्लरची झाडे लावत राहिला. साठी उलटली तरी त्यांचा 'एकमेकां देऊ हात, साधू स्वतःची आणि पर्यावरणाची भरभराट,' असा अनोखा उपक्रम सुरू आहे.

इकडे आणखी गंमत झाली. एक नेत्रतज्ज्ञाने हियाची तपासणी करून त्याच्या एका डोळ्याची दृष्टी परत येऊ शकते असे सांगितले. हिया म्हणतो, "दृष्टी मिळाली तरी मी हेच काम सुरू ठेवीन." झाडांनी या दोघांना सगळे दिले आहे. त्यांच्यासाठी ती खूप महत्त्वाची आहेत.

येणारी पिढी दोघांचे कार्य लक्षात ठेवेल. त्यांच्याबद्दल कृतज्ञ राहील. त्यांचे कार्य थोर आहे. त्यांनी माळरानावर जंगल वसवले आहे. आपण यापासून प्रेरणा घेऊन निदान काही झाडे तर लावू शकतोच. तेही शक्य नसेल तर कुंड्यांतून लहानलहान झाडे लावून जोपासू शकतो. जुने डबे, बादल्या वापरू शकतो. हिरवाई वाढवू शकतो. आज त्याचीच तर आवश्यकता आहे. इच्छा, चिकाटी आणि थोडा वेळ यांमुळे सकारात्मक बदल सहज घडवता येतात.

मुलांनो, यू ट्यूबवर हिया आणि वेन्ची यांचा व्हिडिओ जरूर बघा.

**संपर्क : ९५२७९४२४१३**

# देवबाप्पा सांग तुझा मेल आयडी काय..?

■ ऐश्वर्य पाटेकर

देवबाप्पा सांग तुझा मेल आयडी काय..?
झाडांच्या पानांवर तुला संदेश धाडू काय..?
बाप्पा इथले गाऱ्हाणे
कानावर घालायचे
खूप साचले मनात
तुला आहे सांगायचे
माझे कुणी ऐकेल का तूच सांगावे उपाय
देवबाप्पा सांग तुझा मेल आयडी काय..?

सगळीकडे गोंगाटाने
व्यापलेला भवताल
दूषिताने दमछाक
झाले आहेत खूप हाल
बुडत्याचा डोहामध्ये असा खोल रुते पाय
देवबाप्पा सांग तुझा मेल आयडी काय..?



केर कचरा साचून
झाली धरित्री खराब
काळी काजळी नभाला
दूर सारावं मळभ
जिथे हात फिरे म्हणे तिथे लक्ष्मीचा गा पाय
देवबाप्पा सांग तुझा मेल आयडी काय..?

नाना रोग माणसाला
झाला माणूस बेजार
तुझ्या उपचारानेच
दूर करावे आजार
आरोग्याचा मंत्र तूच पुन्हा उच्चारून जाय
देवबाप्पा सांग तुझा मेल आयडी काय..?

व्यथा एवढ्या तेवढ्या
लोक गेलेत खचून
निराशेचा ढग त्यांनी
टाकावा गा झटकून
सांग चटक्याशिवाय दूधा येत नाही साय
देवबाप्पा सांग तुझा मेल आयडी काय..?


कुणी नसावा गरीब
कुणी नसावा श्रीमंत
वाटा समान असावा
आण एका पंगतीत
आंधळ्याला द्यावे डोळे लंगड्याला द्यावे पाय
देवबाप्पा सांग तुझा मेल आयडी काय..?

थोड्या थोड्या गोष्टींसाठी
लोक खूप भांडतात
चार आण्यांसाठी जीव
एकमेकांचा घेतात
सलोख्याचा शब्द जो तो गेला विसरून काय
देवबाप्पा सांग तुझा मेल आयडी काय..?

माणुसकीला वाळवी
आणि संवाद खुंटला
कुणी कुणाशी न बोले
मळा स्वार्थाचा फुलला
लेकीसाठी गा नांदत्या असो माहेरात माय
देवबाप्पा सांग तुझा मेल आयडी काय..?

संपर्क : ९८२२२९५६७२







रामकृष्ण अघोर

# ॥ पाऊले चालती पंढरीची वाट ॥

भारत देश हा संस्कृतीप्रधान असण्याचे मुख्य कारण म्हणजे येथे साजरे केले जाणारे सण, उत्सव! परंपरा, यांची पाळेमुळे आपल्याकडे खूप खोलवर रुजली आहे. या सर्वाला फक्त अध्यात्माचा नव्हे तर विज्ञानाचा आधार देखील आहे.

संपूर्ण जनता ही उन्हाळ्यातील कडक उन्हामुळे होरपळून निघालेली असते. उन्हाच्या त्रासामुळे व्याकूळ झालेली असते. वैशाखाचा वणवा सर्वत्र पेटलेला असतो. वैशाखाचा शेवट होऊन ज्येष्ठ व आषाढ याची चाहूल लागलेली असते. शेतकरी संपूर्ण शेत नांगरून उन्हाळी कामे संपवून तयार असतो आणि सर्व भक्तगण आषाढ महिना केव्हा येईल याची वाट पहात असतो. कारण आषाढ हा महाराष्ट्रातील पावसाच्या आगमनाचा महिना असतो. या काळात पावसाच्या सरी येत जात असतात.

त्यामुळे सर्वांनाच हायसे वाटून उकाड्यापासून मुक्तता मिळत असते.

आषाढी एकादशीपासून ते प्रबोधिनी (कार्तिकी) एकादशी असा चार महिन्यांचा काळ हा चातुर्मासाचा असतो. आपल्या शेतात पेरणी करून शेतकरी आपले शेत आणि शेतात पेरणी केलेले पीक हे पांडुरंगाच्या हवाली करून पंढरपूरला विठोबाच्या पायी मस्तक ठेवून 'यंदाची सुगी चांगली येऊ देत, अवघ्या मानव जातीवर कोणतेही संकट येऊ देऊ नकोस' असं मागणं तो विठोबाकडे मागतो. मोठ्या भक्तिभावाने केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर अनेक राज्याराज्यांतून आणि परदेशातून लाखो भाविक ही परंपरा पाळताना दिसून येतात.

आषाढ महिन्यात पाऊस असतो तसेच अग्नी मंद होऊन पचनसंस्था मंदावलेली असते. अशा वेळी जड पदार्थ खाणे आपल्या आरोग्यासाठी योग्य नसते. म्हणून या काळात 'उपवास करणे आरोग्यासाठी हितकारक असे' आषाढी एकादशीचे वैज्ञानिकांनी महत्त्व सांगितले आहे. असंख्य वारकरी लोक शेकडो किलोमीटर वरून पायी निसर्गाच्या वातावरणात भक्तिमय होऊन नैसर्गिक प्राणवायूचा फायदा घेऊन स्वतःचे आरोग्य सुधारून निरोगी होण्याचा प्रयत्न करतात. महाराष्ट्रातील संतांच्या हृदयात स्थान असणारे, अवघ्या महाराष्ट्राचे दैवत म्हणजे पंढरपूरचा विठोबा आणि पंढरपूरच्या वारीला आठशे वर्षांपेक्षा जास्त अशी परंपरा आहे.

पंढरपूरचे देवालय व देव अत्यंत पुरातन असून अनेक वेळा मंदिराची पुनर्बांधणी झाली आहे. शालिवाहन वंशातल्या एका प्रतिष्ठित अशा राजाने इसवी सन ८३ मध्ये जीर्णोद्धार केला. ताम्रपटावरून इसवी सन ५१६ मध्ये राष्ट्रकुटांच्या काळात पंढरपूर हे चांगल्या वस्तीचे ग्राम असल्याचा पुरावा आढळतो. इसवी सन १२३९ च्या लेखावरून देवगिरीच्या यादवांनी ह्या स्थळास भेट दिल्याचा पुरावा आहे. पादुका प्रदक्षिणेची वहिवाट इसवी सन १२८६ मध्ये चालू झाली. तर इसवी सन १६५० मध्ये हैबत बाबांनी आळंदीहून निघून पंढरपूरला पोहोचण्याची पालखीची प्रथा पाडली.

त्या पालखीची शोडषोपचार (सोळा संस्कार) पूजा होऊन ती पालखी प्रथम ज्ञानेश्वर महाराजांच्या मामाच्या गावी आपेगाव येथे जाते. ज्येष्ठ महिन्याच्या कृष्ण पक्षातील सप्तमीला देहूहून संत तुकारामांची तर अष्टमीला आळंदीहून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे प्रस्थान पंढरपुराकडे होते. तसेच शेगाव येथून श्री संत गजानन महाराजांची कित्येक दिवस आधी, त्र्यंबकेश्वराहून निवृत्ती नाथांची, पैठणहून एकनाथांची, उत्तर भारतातून कबिरांची पालखी इत्यादी लहानमोठ्या पालख्या बहुसंख्य वारकऱ्यांसमवेत पायी निघतात. विठूनामाचा गजर करत, विठ्ठलाच्या भक्तीत दंग झालेले वारकरी; एकतारी व टाळ, झाजांच्या तालावर तुकोबा, ज्ञानेश्वरांचे अभंग गात, गळ्यात तुळशीच्या माळा, कपाळी गंध, देवाला फराळाचा नैवेद्य सोबत घेत, गावोगावी भजन कीर्तन करत डोक्यावर तुळशी वृंदावने घेऊन नाचत, फुगड्या खेळत, संपूर्ण संसार विसरून मोठ्या भक्तीभावाने चालत चालत पंढरीत दाखल होतात. महाराष्ट्रातील संत संप्रदायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा व सांस्कृतिक परंपरेतील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचलेला हा अनन्यसाधारण असा सोहळा आहे. संत ज्ञानेश्वरांचे धाकटे भाऊ संत सोपानदेव यांची पालखीदेखील सासवड येथून पंढरपूरला रवाना होते.

या पालखीच्या सोहळ्यात म्हणजे वारकरी दिंडीमध्ये गरीब-श्रीमंत, सर्व जातींचे, सर्व पंथांचे, सर्व धर्मांचे लोक गळ्यात वीणा अडकवून, टाळ-मृदंगाच्या तालावर सहभागी होतात. धोतर, पायजमा, सदरा, गांधीटोपी आणि महिला नऊवारी साडी, इतक्या साध्या वेषात स्वतःलाच विसरून पांडुरंगाच्या चरणी लीन होण्यासाठी जातात.

हे वारकरी पंढरपुरात चंद्रभागेत स्नान करून तुळशीची माळ गळ्यात अडकवून, झाडाखाली वास्तव्य करत आहारावर नियंत्रण ठेवत निसर्गाशी नाते जोडतात. कपाळी बुक्का व चंदनाचा टिळा, डोक्यावर तुळशीची रोपे, मुखी विठ्ठलाचे नाम, ज्ञानेश्वरांच्या ओव्या, तुकारामांचे अभंग यांच्या भक्तिरसात न्हालेले मन संपूर्ण वातावरण विठ्ठलमय करते. अशा रितीने वारीच्या संबंधाने हा आषाढी एकादशीचा सण विज्ञानाशी जोडलेला आहे. सर्व जण उत्साहाने आनंदित असतात व हा आनंद वर्षभर पुरवून कृतकृत्य होतात आणि पुढच्या वर्षीच्या आषाढी एकादशीची स्वप्ने पाहत परत संसाराकडे वळतात.

**संपर्क** : ९९७०५९५२८५

# किशोर साठी साहित्य पाठवा

मागील ५४ वर्षांपासून 'किशोर' मासिक अविरतपणे ज्ञान आणि मनोरंजनाचा खजिना घेऊन येत आहे. किशोर मासिकाने अनेक पिढ्यांवर वाचनाचे ज्ञान-विज्ञानाचे व मूल्यांचे संस्कार केले आहेत. मुलांच्या बुद्धीला, तरल कल्पनाशक्तीला आणि जिज्ञासेला सतत काहीतरी हवे असते. काही अद्भुत, रम्य विलक्षण असे पहावे, ऐकावे याकडे त्यांचे मन सारखे झेपावते. त्यांच्या या सर्वांगाने, सर्वांशाने फुलण्याच्या काळात मुलांना काही मदत व्हावी हा 'किशोर' मासिकाचा विचार आहे. मुलांसाठी गुणवत्तापूर्ण लेखन करणाऱ्यांना 'किशोर' मध्ये कायमच लेखनाची संधी दिली जाते. आपणही आपले साहित्य 'किशोर'कडे पाठवा. कथा, कविता, लेख, नाटिका, कोडी इत्यादी साहित्य प्रकाशित करण्यासाठी ते 'कार्यकारी संपादक' या नावाने पाठ्यपुस्तक मंडळाच्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावे. आपले साहित्य पाठवताना कृपया खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

१) आपले स्वरचित तसेच इतरत्र प्रसिद्ध न झालेले लेखन पाठवावे. ते प्रसिद्धीस योग्य वाटल्यास त्याचा निश्चितच विचार केला जाईल.

२) साहित्य हे रंजक, उद्बोधक व मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणारे असावे.

३) साहित्याचा आशय व भाषा आठ ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना समजेल अशी असावी.

४) कथा लेखन ५५० ते ६०० शब्दमर्यादेत असल्यास उत्तम.

५) किशोर मासिक मराठी भाषेत प्रकाशित केले जाते व यात ४ पानांचा इंग्लिश विभाग असून त्यात २ पानांची १ इंग्लिश भाषेतील कथा व १ पानाची इंग्लिश भाषेतील कविता व १ पानाचे चित्रकोडे प्रसिद्ध केले जाते.

६) साधारणपणे ज्या महिन्याच्या किशोर अंकासाठी आपल्याला लेखन करायचे आहे त्या महिन्याच्या किमान तीन महिने आधी आपले लेखन पाठवावे.

७) अस्वीकृत साहित्य परत पाठवले जाणार नाही.

८) साहित्य स्वीकृत अथवा अस्वीकृत करण्याचे सर्व हक्क संपादक यांचे असतील.

९) एकदा पाठवलेले साहित्य पुन्हा पाठवू नये.

१०) माहितीसाठी व संदर्भासाठी किशोरचे अंक https://kishor.ebalbharati.in/archives/ या वेबसाईटवर मोफत उपलब्ध आहेत. ते जरूर पाहावेत व वाचावेत. यामुळे आपणास किशोर अंकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखनाची ओळख होईल.

**आपले साहित्य पुढील पत्त्यावर पाठवा.**


**कार्यकारी संपादक, किशोर**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११००४,

**संपर्क : ०२०-२५७१६१४४**

**ई-मेल: executive_editor_kishor@ebalbharati.in**








# योग

■ संजय गावंडे

योगाची आसने
करती सदृढ;
तेव्हा होते दृढ
तनमन.

भरतीया स्फूर्ती
जगण्यात सदा;
आनंदाचा वादा
करतसे.

आजार पाजार
पळताती दूर;
नाही मग घोर
जगण्यात.

सुंदर होतसे
अंतर्बाह्य मन;
याच्या विना धन
नाही थोर.

म्हणूनिया डंका
जगताती असे;
कमी मुळी नसे
आयुष्यात.....

संपर्क : ९६७३५३७४०६





# कुतूहल

वसुंधरा भोपळे, ७३८७४३२९४१

'किशोर' मित्रांनो, 'किशोर' मे २०२५ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ जून २०२५ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत.

**१. हिवाळ्यात दक्षिणेकडे स्थलांतर करणाऱ्या 'युरेशियन गोशॉक' अर्थात युरेशियामध्ये आढळणाऱ्या ससाण्याचे नुकतेच महाराष्ट्रातील तानसा अभयारण्यात दर्शन घडले. हे तानसा अभयारण्य कोणत्या जिल्ह्यात आहे?**

१. चंद्रपूर २. सिंधुदुर्ग
३. ठाणे ४. नंदुरबार

**२. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नुकताच प्रदर्शित झालेला 'छावा' चित्रपट ----- यांच्या 'छावा' कादंबरीवर आधारित आहे.**

१. विश्वास पाटील २. शिवाजी सावंत
३. आनंद यादव ४. विंदा करंदीकर

**३. साने गुरुजींच्या अजरामर पुस्तकाचे नाव काय ?**

१) बलसागर भारत २) जय जवान जय किसान
३) हस रे माझ्या मुला ४) श्यामची आई

**४. उत्तर गोलार्धात सर्वात मोठा दिवस आणि सर्वात लहान रात्र असते त्यास उत्तरायण दिवस असेही म्हणतात. या दिवशी सूर्य कोणत्या अक्षवृत्तावर असतो ?**

१. ग्रिनीच रेखा २. कर्क वृत्त
३. मकरवृत्त ४. विषुववृत्त

**५. नुकताच ५९ वा ज्ञानपीठ पुरस्कार हिंदी लेखक विनोद कुमार शुक्ल यांना मिळाला आहे. ते ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित होणारे --------- राज्याचे पहिले लेखक ठरले.**

१. उत्तराखंड २.छत्तीसगढ
३. हरियाणा ४. उत्तरप्रदेश

**६. जागतिक पर्यावरण दिवस : ५ जून : आंतरराष्ट्रीय योग दिवस ?**

१. १० जून २. ११ जून ३. २० जून ४. २१ जून

**७. 'जागतिक महासागर दिवस' कधी साजरा केला जातो?**

१. ५ जून २. ८ जून
३. १० जून ४. १५ जून

**८. कोणत्या महापुरुषाच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात 'सामाजिक न्याय दिवस' साजरा केला जातो?**

१. छत्रपती संभाजी महाराज
२. छत्रपती शिवाजी महाराज
३. छत्रपती शाहू महाराज
४. छत्रपती राजाराम महाराज

**९. समर्थ रामदास : मनाचे श्लोक : : संत कबीर : ?**

१. दोहे २. पोवाडे ३. ओव्या ४. फटके

**१०. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक कोठे आणि कधी झाला ?**

१. राजगड, ६ जून १६७४
२. रायगड, ६ जून १६७४
३. प्रतापगड, ६ जून १५७४
४. सिंहगड, ६ जून १५७४

**११. 'आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक २०२५' चे यजमानपद कोणत्या देशाला मिळाले आहे ?**

१. भारत २. ऑस्ट्रेलिया
३. इंग्लंड ४. दक्षिण आफ्रिका

**१२. अलीकडेच बातम्यांमध्ये उल्लेख करण्यात येणारा 'कार्टोसॅट-३' हा कोणत्या प्रकारचा उपग्रह आहे?**

१. पृथ्वी निरीक्षण उपग्रह
२. संप्रेषण उपग्रह
३. नेव्हिगेशन उपग्रह
४. खगोलीय उपग्रह



१३. 'आंतरराष्ट्रीय योग दिवस २०२५' चे घोषवाक्य काय आहे?
१. निरोगी आयुष्यासाठी योग
२. माझे जीवन माझी योगसाधना
३. सार्वजनिक आरोग्यासाठी योग
४. 'एक पृथ्वी-एक आरोग्य' याकरिता योग

१४. सध्या चर्चेत असणारे पंडोह धरण कोणत्या राज्यात आहे ?
१. हिमाचल प्रदेश २.पंजाब ३. केरळ ४. सिक्कीम

१५. कावल व्याघ्रप्रकल्प कोणत्या राज्यात आहे ?
१. राजस्थान २.बिहार ३.मध्यप्रदेश ४.तेलंगणा

## चित्रकोडे
रचना - घनश्याम देशमुख

## मे २०२५ चित्रकोडे उत्तर




## किशोर एप्रिल २०२५ चित्रकोडे यशस्वी स्पर्धक

**सिंधुदुर्ग** – कु. पार्थ नेवरेकर, कु. मानवी नाईक, कु. खुशी धुरी, कु. धनश्री तारी, कु. विर्तिका शेर्लेकर, कु. चैताली धुरी, कु. वासंती धुरी, कु. नंदिनी धुरी, कु. यश मेस्त्री, कु. तेजस्विनी कराड, कु. नईम मुजावर, कु. दिपक मेस्त्री, कु. तन्मय जाधव, कु. सौम्या आमडोस्कर, कु. ऋषभ माळकर, कु. तृप्ती काळे, कु. नव्या माळकर, कु. विधी घाडी, कु. राजवी माळकर, कु. मनस्वी नरसाळे, कु. तुषार काळे, कु. अविका नरसाळे, कु. संबोधी सावंत, कु. विहान घाडी, कु. विक्रांत घाडी, कु. ऋषभ घाडी, कु. राणी हरमलकर,
**कोल्हापूर** – कु. अथर्व खांडेकर,
**नांदेड** – कु. पृथ्वी ढगे, कु. जीक्र शेख, कु. गफार फाजलाणी, कु. जैद शेख
**लातूर** – कु. शौर्य नरहरे, कु. अर्णव जगताप,
**परभणी** – कु. शर्वरी चांडक, कु. प्रचिती चांडक
**अहिल्यानगर** – कु. श्रावणी देशमुख, कु. आरोही धस, कु. श्लोक आमले, कु. आरोही धस, कु. प्रिशा धस, कु. पार्थ वाणी, कु. रुद्र वाणी, कु. स्वरा वाणी, कु. स्वस्तिक वाणी, कु. वेदिका गमे,
**ठाणे** – कु. अनन्या भेरे

## कुतूहल (मे २०२५) ची उत्तरे

| | | | |
|---|---|---|---|
| १-३ | ५-१ | ९-२ | १३-३ |
| २-२ | ६-१ | १०-१ | १४-३ |
| ३-२ | ७-२ | ११-२ | १५-२ |
| ४-४ | ८-२ | १२-३ | |

## किशोर एप्रिल २०२५ कुतूहल यशस्वी स्पर्धक

**नांदेड** – कु. दिग्विजय ढगे, कु. गजानन लाकडे, **परभणी** – कु. शर्वरी चांडक, **पुणे** – कु. ज्ञानेश जोशी, **सातारा** – कु. सुवीर फडे, **अकोला** – झुबेर खान

**पुणे** – कु. सुमेध धनोकर, कु. सुयश शिंदे, कु. अर्णवसिंग राजपूत
**वर्धा** – अनुष्का देखमुख, कु. भक्ती कनेर, कु. वैदेही होले, कु. खुशाली उमरकर, कु. कृष्णाली घाटोळे, कु. आराध्या राऊत, कु. वैष्णवी वैराळे, कु. ईश्वरी लंगडे, कु. स्वस्तिका चरडे,
**यवतमाळ** – कु. आदिल अन्सारी, कु. तन्मय तेजे, कु. वीर पवार, कु. युग जाधव, कु. शौर्य कमशम, कु. दिपाली चौधरी, कु. आरूषी कमराम,
**सातारा** – कु. ध्रुव जगदाळे, कु. आर्यन जगदाळे, कु. शौर्य सरगडे, कु. सुवीर फडे, श्रीयांश सावंत,
**रत्नागिरी** – कु. स्वराली कुळये,
**नागपूर** – कु. अवनीश जोशी,
**अहिल्यानगर** – कु. ओवी गायके,
**बीड** – कु. साक्षी डिगे, कु. वैष्णवी घुले, कु. वेदांग डिगे, कु. दुर्वा पडोळे, कु. दुर्गा सापते, कु. प्रितम घुले, कु. अवधूत राऊत, कु. अनिकेत शिर्के, कु. प्रताय राजपुरे, कु. आरती गायकवाड, कु. राधिका बनसोडे, कु. समृद्धी राजपूरे, कु. कय्युम शेख, कु. समर्थ राजपुरे, कु. आदेश तरटे, कु. आयान शेख, कु. कार्तिक बोडखे,
**छत्रपती संभाजीनगर**– कु. सायली डोळस,
**रत्नागिरी** – कु. तेजस भुवड, कु. सोहम भुवड, कु. अनिश भुवड, कु. सोनल भुवड, कु. शरिफा चोगले, कु. साजिरी भुवड, कु. अन्वेश जाधव, कु. लावण्या तुळशिराम साळुंखे, कु. दिव्या कोलगे, कु. जान्हवी गुरव, कु. वेदिका दिवाळे, कु. आकांक्षा धावडे, कु. आर्या संतोष शिंदे, कु. करूणा पड्यार, कु. निधी ठिक, कु. खुशी नामये, कु. विधी सोडये, कु. दुर्वा नामये, कु. सुदिक्षा राडये, कु. आरोही नामये, कु. दुर्वा शिंदे.

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

- तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
- जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
- ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ'. तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु. ५/– चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.



मी शाळेतून येताना आमच्या गॅलरीजवळच्या पत्र्यावर चिमण्या येऊन काही खायला प्यायला मिळतं का शोधत असत. मी असे दोन–तीन दिवस त्यांचे निरीक्षण केले व आईला सांगितले की, आपण चिमण्यांसाठी दाणापाणी ठेवूया का? आईने व मी मिळून चिमणीसाठी घरटं तयार करायला घेतलं. आम्ही टाकाऊपासून टिकाऊ असं घरट तयार करण्याचं ठरवलं. बाटली आणि सुतळीचं पोतं वापरून आम्ही त्यांच्यासाठी छोटसं, मस्त असं घरटं तयार केलं. त्या घरट्यात त्यांना तांदूळ, चपातीचे तुकडे, दाणे खाण्यासाठी ठेवले, व त्यांना एका भांड्यात पाणी ठेवलं. मी रोज त्यांचे निरीक्षण करू लागले. घरट्यात जाऊन दाणे खाऊन झाल्यावर ते पाणी पीत असत. मी रोज त्यांना खायला देत होते. रोज दुपारी त्यांचा किलबिलाट ऐकू येऊ लागला. त्यांचा आवाज खूप छान वाटू लागला.

**कु. रेणू भीमाशंकर शेतसंदी**
इयत्ता तिसरी, आदर्श प्राथमिक विद्यालय, आगाशिवनगर,
ता. कराड, जि. सातारा. ४१५५३९.



आम्ही मित्रमैत्रिणी एकदा मैदानात खेळत होतो. तेव्हा मला एक गोंडस असे मांजरीचे पिल्लू दिसले. मी सगळ्यांना त्याच्याविषयी सांगितले. आम्ही त्याला जवळ घेतले व घरी जाऊन त्याला दूध पाजले. त्याला एका टोपलीत सुरक्षित ठेवले. जेव्हा आम्ही दुसऱ्या दिवशी त्याला पाहायला गेलो तेव्हा ते तेथे नव्हते. आम्ही त्याला खूप शोधले पण ते सापडले नाही. तेव्हा मला एका झुडपातून म्याँव–म्याँव असा आवाज आला. मी तेथे पाहिले तर ते पिल्लू तेथे होते. त्याच्या पायाला कसलीतरी जखम झाली होती. आम्ही त्याला घरी आणले व त्याच्या पायावर उपचार केला. त्याला दूध पाजले. त्याची जखम बरी झाल्यावर ते त्याच्या आईकडे निघून गेले. आम्हांला खूप आनंद झाला.

**कु. तन्वी संदीप गदादे**
जि. प. प्राथमिक शाळा हंगेवाडी, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर ४१४७०१



शाळेतून घरी जाताना मला एक कबुतराचे पिल्लू दिसले. त्याच्या डाव्या पायाच्या अंगठ्यापाशी छोटी जखम झाली होती. त्या जखमेतून रक्त निघत होते. मी त्याला माझ्या घरी आणले. त्याच्या जखमेवर हळद लावली. त्यामुळे ते हळूहळू खाली पाय टेकवायला लागले. मला खूप आनंद झाला. थोड्याच वेळात माझी मावशी म्हणाली, ''त्याला कणकेचे छोटे-छोटे तुकडे करून टाक.'' मी त्याला खायला टाकले. मी शाळेत जाताना त्याला त्या रस्त्यावर सोडले. तेवढ्यात तेथे खूप कबुतरे जमा झाली. ती सगळी कबुतरे उडून गेली. मला खूप आनंद झाला.

**कु. ऋतुजा खंडू नेमाने**
जि.प.प्राथमिक शाळा, केळसांगवी,
ता. आष्टी, जि. बीड ४१४२०८.



मी मामाच्या गावाला गेले होते. तेथे घरापासून थोड्या अंतरावर एक दुकान होते. मी मामाच्या मुलीबरोबर दुकानात गेले होते. आम्ही दुकानाजवळ गेलो तेवढ्यात लक्षात आले की, आम्ही खाऊचे पैसे घरीच विसरलो मग आम्ही मागे आलो. आता आम्ही पैसे घेऊन आलो होतो. आम्हा दोघींना दहा-दहा रुपये दिले होते. तिथे पाण्याची बाटली वीस रुपयांना होती. दुकानाच्या पलीकडे एक आजी अस्वस्थ अवस्थेत बसलेल्या होत्या. त्या अनोळखी आजी पिण्यास पाणी मागत होत्या. मला व मामाच्या मुलीला दया आली. एक पाण्याची बाटली घेऊन आम्ही दोघींनी त्यांना दिली. त्या आभार मानू लागल्या, आम्ही धावत घरी गेलो. मामी व मामा यांना ही गोष्ट सांगितली. त्यांनी आम्हां दोघींना शाबासकी दिली.

**कु. प्रणिता विजय गोखे,** जि.प.प्रा.शाळा
राघुचीवाडी, ता. जि. धाराशिव ४१३५०१.



मी शाळेतून घरी चालले होते. निरा-भोर एस.टी. बस आली. मी बसमध्ये जागा मिळवली. एक आजोबापण बसमध्ये आले. त्यांच्या पायाचे ऑपरेशन झाले होते आणि त्यांच्याकडे एक पिशवी पण होती. पूर्ण बस भरली होती. कोठेही बसायला जागा नव्हती. मग मी उठले आणि त्यांना बोलावून बसायला जागा दिली आणि मी उभी राहिले. ते म्हणाले, ''आता राहू दे बस तू'' मी म्हणाले, ''अहो आजोबा मला इथेच उतरायचे आहे. बसा तुम्ही.'' मग आजोबांनी माझ्या गालावरून हात फिरवला व म्हणाले, ''शिका. मोठे व्हा व अशीच दुसऱ्यांना मदत करत रहा.'' मला खूप आनंद झाला.

**कु. हतिका रविकिरण धसाडे,** जि. प. प्राथमिक
केंद्रशाळा अंदोरी, ता. खंडाळा, जि. सातारा



एकदा मी, आई आणि बाबा नवसह्याद्री पोस्टच्या जवळ गुरुजी इडली खायला गेलो होतो. इडली खाऊन झाल्यावर आम्ही आमची गाडी जिथे होती त्या ठिकाणी निघालो. गाडीवर बसताना मला नाणे पडल्याचा आवाज आला. त्या दिशेनी मी पाहिले तर एका आजोबांच्या खिशातून नकळत नाणे पडले होते. मी तसेच घरी न जाता धावत जाऊन आजोबांना ते नाणे दिले. त्यांनी आमचे आभार मानले.

**कु. अनुराग आवेकर,**
आनंदक्षण शाळा,
ता. हवेली, जि. पुणे ४११०५१

उमलती प्रतिभा

# निसर्ग

*निसर्गात आहेत अनेक झाडे*
*निसर्गात बहरले आहे खेडे*
*निसर्ग आहे सर्वत्र पसरलेला*
*अन् इकडून तिकडे बहरलेला*
*निसर्गाला लावली अनेक विशेषणे*
*त्यावर म्हणतो आपण गाणे*
*निसर्गात असते शुद्ध हवा*
*थंड थंड हवेचा गारवा*
*सुंदर निसर्ग अवती भवती*
*झाडे सुद्धा मनोमन हसती*

**कु. वासंती शंकर धुरी**
इयत्ता- सहावी, जि. प.पु.प्राथमिक केंद्र शाळा, शेर्ले नं.१,
मु. शेर्ले, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग.

# माझी शाळा

एक आहे शाळा.
लावत होती लळा.
त्या शाळेतील मुले.
जणू देवा घरची फुले.
मुले काढतात चित्र
सर्व जण होती जिवलग मित्र.
आम्हांला शाळा देते ज्ञान.
सर्व जण अभ्यास करतो छान.
आम्ही शाळेचा राखतो मान.
वाढवतो भारत देशाची शान.

**कु. हिंदवी तुकाराम बेलदार**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राघुचीवाडी,
ता. जि. धाराशिव



**कु. कविता भागिनाथ खांडेकर**
इ. सहावी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हंडाळवाडी,
ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर ४१४१०२




**कु. नेहा अरुण जमेवार**
जि. प. केंद्र म. उच्च प्राथमिक शाळा,
कवठळ, ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा ४४४२०२.

# वृक्ष आपले मित्र

माणसे झाडांना तोडतात. त्यांना विकतात. त्याचे पैसे घेतात. माणसांना पैशांपुढे जीवन काहीच दिसत नाही. आपण झाडं तोडतो तेव्हा त्यांना तर इजा होतेच पण आपल्यालाही ऑक्सिजन पुरवठ्याची गरज असते, ती पूर्ण होत नाही. जर झाडंच नाही राहिले, तर ऑक्सिजन कुठून येणार? झाडं तर आपल्याला ऑक्सिजन पुरवतात जर ते झाडं तोडून टाकले, तर ऑक्सिजन नाही मिळणार आणि ऑक्सिजन शिवाय आपण. यावरूनच हे लक्षात येते की काही लोक आपल्या जीवाहूनही पैशावर जास्त प्रेम करतात. अरे, आपण पैशापेक्षा मौल्यवान आहोत. पैसे नाहीत आपल्यापेक्षा मौल्यवान. काहींना वाटत असेल की पैसे खूप मौल्यवान आहेत, तर नाही! आणि आपण पैसे मिळवण्यासाठी जीवाची पर्वा न करता झाडांना तोडतो. अशा काही लोकांचे विचार बदलायला हवेत. झाडांचे महत्त्व त्यांना सांगायला हवे.

दुसरी गोष्ट अशी की या काळात कोणी खऱ्या झाडांना का महत्त्व देत नाही? या काळात प्लॅस्टीकची, शोभेची झाडे चालतात. खरी झाडे जसे आपल्यासाठी शोभेची झाडे, आणि शोभेची झाडे खरी झाडे झाली. 'शोभेची झाडे' आपण घरात जपून ठेवतो, पण ते थोडीचआपल्याला ऑक्सिजन देतात?

**कु. संबोधी संदीप गवई**
इ.(६वी), जवाहर नवोदय विद्यालय
शेगाव, जि. बुलढाणा ४४३३०१.



**कु. अन्विता किशोर दसोरे,** वर्ग १ ला, श्री संत गजानन महाराज इंग्लिश कॉन्व्हेंट शेगाव, जिल्हा बुलढाणा - ४४४२०३


**वेदांत मोरे,** इ. ६ वी, जिल्हा परिषद शाळा आमणापूर ता. पलूस जि. सांगली

# जादूगाराची सुटका

घनश्याम देशमुख संपर्क : ९८२३४१३६२९




रमेश इथेच थांबेल आणि जादूगाराच्या कुटुंबावर लक्ष ठेवेल. काम फत्ते झाले की....
जादूगाराला हे लोक कुठे घेऊन जाणार आहेत? काहीतरी गडबड आहे..
तू काळजी करू नकोस. आम्ही दोघांनीही गॉगल घातले आहेत... त्याला त्याच्याच गाडीत घेऊन येतो.
फोन ठेवून तो परत बंगल्यात शिरला.
काय झालं? तो काय बोलत होता कळलं का?
तो जादूगाराला घेऊन कुठेतरी जाणार आहे. पण कुठे ते कळलं नाही.....
क्रमशः



# पाखरशाळा

■ संतोष आळंजकर

झाडावरची किलबिल, ऐकतोस ना बाळा
इवल्या इवल्या देवदूतांची, भरते येथे शाळा

कोण उठवतो त्यांना आई, कोण भरवतो शाळा
रोज म्हणण्या नवी प्रार्थना, होते कोण गोळा?

कोठे ठेवत असतील दप्तर, कुठे पिण्याचे पाणी
अभ्यासाला कंटाळल्यावर, म्हणत असतील का गाणी

मित्रासंगे कधी कुणाचा, होत असेल का तंटा
खेळाच्या तासाला कोणी, लपवत असेल का घंटा

रविवारची सणासुदीची, असते का त्यांना सुट्टी
कोण अचानक शाळेला, मारत असेल का बुट्टी

पाऊस येतो तेव्हा त्यांची, गळत असेल का शाळा
पंख झटकून पुन्हा नव्याने, भरत असेल का शाळा

केव्हा भरते सुटते शाळा, कळत कुणाला नाही
झाडच त्यांचे घर अन् शाळा, झाडच त्यांची आई

संपर्क - ९४२३७२४४५०

इंग्रजी विभाग

■ Roshankumar Pilewan

# BABY DOLL

*I have a baby doll*
*She is too small*
*I am growing gradually*
*But she isn't at all*

*She has no thirst*
*No hunger for food*
*Never laughs, not a cry*
*Stays in a constant Mood*

*Never plays on the ground*
*Lies in a corner, gets up never*
*She has no school*
*No study forever*

*She never watches T.V.*
*Doesn't like the mobile*
*I want to play with her*
*For longer than a while*

*She is my best friend*
*She Plays with me only*
*She makes me bloom*
*When I am lonely*

***Contach. 7798509816***



# The Brave Ant Army

Charuta Prabhudesai

Once, there was a tree. Beneath it stood an anthill, home, a colony of ants. Some ants were red, some black, and some grey. All the ants were always busy, constantly on the move.

Some ants ran one after another, while others carried grains of food. As they hurried along, they would briefly bump into each other before continuing on their way. This busy parade of ants looked just like a group of marching soldiers.

In this colony lived a small red ant named Chinty. Chinty was not only active but also very brave. It had a group of friends—almost like Chinty's own little



army. They loved to jump and dance on flower petals, leaves, and fruits. During mango season, Chinty and its friends would stay on the mango tree, sipping the sweet juice and enjoying themselves.

One day, while Chinty and its friends were wandering on the mango branches, they came across a bulbul's nest. Inside the nest were small eggs. The bulbul mother and father were flying nearby, protecting the eggs.

Suddenly, a small snake appeared, trying to climb the tree to eat the eggs. The bulbul parents fluttered their wings and tried to scare it away, but they were too small and helpless to stop it.

Chinty and its friends were watching everything. Being brave, Chinty said, “Come on, friends, we can help the bulbul pair and save the eggs!”

“But what can we do?” the friends asked.

Chinty replied, “We’re red ants. Our bites are powerful, aren’t they? Let’s all bite the snake—it will definitely work!”

“Let’s go!” shouted the ant gang in unison.

And so, the red ant army sprang into action. The snake started to itch and squirm from the bites all over its body. As it tried to climb the tree, the ants kept attacking it, preventing it from going any higher. Bitten here and there, the snake finally gave up and slithered away.

The bulbul pair watched in surprise as the snake turned back and disappeared. Then they saw the brave Chinty gang on the branch. With joy and relief, the bulbuls thanked them.

Meanwhile, Chinty and its friends returned to their favorite pastime—enjoying sweet mango juice!

**Contact :**
**9922751819**

‘किशोर’ हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक सचिन मेहता यांनी मे. प्रिंटप्लस प्रा. लि., गाळा नंबर १ ते १०, ई–१, जय जलाराम इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपलास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३११. येथे छापून ‘बालभारती’, सेनापती बापट रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. ✻ संपादक – कृष्णकुमार पाटील.

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Sachin Mehta, Printed at M/s. Printplus Private Limited., G-1 to G-10, E-1, Jai Jalaram Industrial Complex, Village Pimplas, Taluka Bhiwandi, Dist-Thane 421311. and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411004. * Editor - Krishnakumar Patil**


# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

**This monster is made out of 7 wild animals.**
**Can you recognise them ?**



**Bear has disturbed the bees as it was trying to take their honey. Count the bees and write the numbers.**



# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्रांचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.


२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ जून २०२५.

३) कोड्याचे उत्तर जुलै २०२५ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered Postal.No. PCW/076/2024-2026 RNI NO. 22679/72
Date of publication 26.05.2025 Date of Posting 27th & 28th May 2025 posted at PUNE PSO, GPO- 411 001

(License to Post without prepayment of postage No. WPP-53/2024-2026)




प्रति,

**If not delivered please return to :**
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग,
पुणे- ४११ ००४.
दूरध्वनी : ०२०- २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in